उत्कृष्ट क्वालिटी
दिवाळी स्पेशल
काजु कतली ८००/- रू.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.३९ ■ मंगळवार १० नोव्हेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26



अध्यादेशावर न्यायालयाचा निर्णय पंचवीसला

कोल्हापूर गोकुळच्या अध्यक्षाची निवड आजच शासन नियुक्त संचालकांचे मतदान बाजूला ठेवा

कोल्हापूर : राज्याचे लक्ष वेधलेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक उद्या (दि.१०) होत आहे. या निवडणुकीत निवडून आलेल्या २५ संचालकांसह शासनाने नियुक्त केलेले चारही संचालकही सहभागी होणार आहेत. मात्र, या चार शासन नियुक्त संचालकांची मते स्वतंत्रपणे बाजूला ठेवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (संभाजीनगर) खंडपीठाने दिले आहेत. त्यामुळे अध्यक्षपदाची निवडणूक पार पडणार असली, तरी शासन नियुक्त संचालकांच्या मतदानाचा प्रत्यक्ष लाभ मिळणार नाही.



गोकुळ मधील शासन नियुक्त संचालकांच्या नियुक्तीला आणि त्यांना मतदानाचा अधिकार देण्याच्या अध्यादेशाला समविचारी आघाडीने न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेवर आज औरंगाबाद खंडपीठात सुनावणी झाली. यावेळी दोन्ही बाजूंच्या वकिलांनी युक्तीवाद केला. मात्र, राज्य सरकारने काढलेला अध्यादेश कायदेशीर आहे की बेकायदेशीर, यावर न्यायालयाने अद्याप अंतिम निर्णय दिलेला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबरला होणार आहे. अध्यादेशाला स्थगिती देण्याची याचिकाकर्त्यांची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे. मात्र, उद्या होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शासन नियुक्त चार संचालक मतदान करू शकतील. परंतु, त्यांची मते अंतिम निकालासाठी बाजूला ठेवण्यात येणार आहेत. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रीकरण करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. निवडणुकीचा निकाल जाहीर केला जाणार असला, तरी ही संपूर्ण प्रक्रिया न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहणार आहे.

सिंघवी यांचा अध्यादेशाला विरोध

समविचारी आघाडी तर्फे ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांनी बाजू मांडली. सरकारने केवळ गोकुळमधील सत्तासमीकरण बदलण्यासाठी अध्यादेश काढल्याचा आरोप त्यांनी केला. **(पान ८ वर)**



कदमांचा गंभीर आरोप

अजित पवारांचा घातपात तटकरेंची चौकशी करा

मुंबई, दि. ९ : राज्यात पुन्हा एकदा राजकीय भूकंप झाला आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. तटकरे यांची महत्त्वाकांक्षा राक्षसी असून, ती पूर्ण करण्यासाठी ते काहीही करू शकतात, असा घणाघातही त्यांनी केला. या आरोपांमुळे महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील संघर्ष आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. **(पान ८ वर)**

अन्नधान्यासह भेटवस्तुचे वाटप

शिंदखेडा तालुक्यातील आच्छी व दत्ताणे गावात शेतकऱ्यांसोबत ना.जयकुमार रावलांची दिवाळी

धुळे, दि. ९- दुष्काळाने शिवारातील हिरवळ हिरावली असली, तरी शेतकऱ्यांच्या मनातील उद्याची आशा कायम आहे. यंदाची दिवाळी शेतकरी कुटुंबांसाठी आव्हानात्मक असली, तरी या संकटातून सावरण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. बळीराजाच्या कष्टाला आधार देणे, त्याच्या हक्काची मदत वेळेत पोहोचवणे आणि पाण्याच्या शाश्वत व्यवस्थेतून शेतीला पुन्हा उभारी देणे, यासाठी शासन कटिबद्ध आहे. दुष्काळाचे सावट दूर करून शिवार समृद्ध करण्यासाठी सर्वतोपरी प्रयतक करण्यात येतील, असा विश्वास राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.



शिंदखेडा तालुक्यातील आच्छी व दत्ताणे येथे आयोजित दिवाळी भेट व अन्नधान्य वितरण कार्यक्रमात पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, धुळ्याचे माजी महापौर प्रदीप कर्पे, माजी स्थायी समिती सभापती सुनील बैसाणे, माजी सभापती जिजाबाराव पाटील, माजी सरपंच अण्णा इंगळे, माजी पंचायत समिती सदस्य नारायणसिंग गिरासे, राहुल पाटील, विश्वनाथ पाटील, **(पान ८ वर)**

नंदुरबार जिल्ह्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी

गायरान व वैयक्तिक जमिनीवर अति. चारा पिकांच्या लागवडीला मान्यता

नंदुरबार, दि.९- राज्यातील दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईची तीव्रता कमी करून पशुधनासाठी हिरवा व सुका चारा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने गायरान तसेच वैयक्तिक जमिनीवर अतिरिक्त चारा पिकांच्या लागवडीला मान्यता दिली आहे. महाराष्ट्र रोजगार हमी-विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत सामुदायिक उपयोगासाठी आणि वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी ही कामे घेता येणार आहे.

सन मधील नैऋत्य मोसमी पावसाची तूट, पावसाचे असमान वितरण, खरीप पिकांच्या उत्पादनातील घट आणि रब्बी हंगामातील संभाव्य घट यामुळे पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याच्या उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने यापूर्वी मंजूर केलेली चारा पिके व वैरणयुक्त वृक्षांसह आणखी लागवडयोग्य चारा पिकांचा योजनेत समावेश केला आहे. विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत अनुज्ञेय कामांपैकी उपजीविकेशी संबंधित पायाभूत सुविधा या प्रवर्गात सामुदायिक उपयोगासाठी चारा लागवड आणि वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी चारा लागवड या दोन कामांचा समावेश आहे. शासनाने या दोन्ही प्रकारच्या कामांसाठी अतिरिक्त चारा पिकांची अंदाजपत्रकेही निश्चित केली आहेत.

लाभार्थ्यांना अनुज्ञेय वाणांचे बियाणे महाबीज, राष्ट्रीय बीज महामंडळ, एचआयएल, कृभको, एनएफएल, आयएफएफडीसी, भारतीय कृषी संशोधन परिषद, कृषी विज्ञान केंद्र **(पान ८ वर)**

झोक्याचा फास तरुणाचा मृत्यू

धुळे, दि.९- येथील देवपूर परिसरातील तरुणाला झोका बांधताना गळफास बसल्याने मृत्यू झाला.आनंद सखाराम खंदळे (वय ३५, रा. आदर्श कॉलनी इंदिरा गार्डन जवळ) असे त्याचे नाव आहे.

रविवारी (ता.८) सकाळी अकराच्या सुमारास त्यांच्या मुलासाठी घराच्या बेडरुममध्ये झोका बांधत होते. छताच्या कडीला स्टुलवर ऊभा राहुन दोरी बांधतांना त्यांचा तोल गेल्याने ते खाली पडले. दोरी त्यांच्या गळ्यास आवळून फास बसला. काही वेळेने ही बाब त्यांच्या पत्नीच्या निदर्शनास आली. त्यांनी आरडा ओरड करीत शेजाऱ्यांना बोलाविले. **(पान ८ वर)**

चाळीसगावरोडवरील पटेल गॅरेजला आग वाहने, साहित्यासह दहा लाखांवर नुकसान

धुळे, दि. ९ : शहरातील चाळीसगाव रोडवरील म्हाडा बिल्डींग समोर असलेल्या पटेल सर्व्हीस स्टेशनला रविवारी रात्री आग लागली. या आगीत सर्व्हीस स्टेशन आणि गॅरेज जळून खाक झाले. आगीत सुमारे दहा लाख ४० हजारांचे नुकसान झाले आहे. दानिश शकील पटेल यांनी याबाबत पोलिसात माहिती दिली. फटाक्यांच्या धोकेदायक आतषबाजीमुळे ही आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



सध्या दिवाळीचा सण सुरू असल्याने सर्वत्र फटाक्यांची आतषबाजी केली जात आहे. याच काळात ठिकठिकाणी आगीच्या घटना घडल्या. त्याला धुळे शहर अपवाद ठरले नाही. शहरातील चाळीसगावरोड लगत असलेल्या पटेल सर्व्हीस स्टेशन आणि गॅरेजला रात्री साडेदहानंतर आग लागली. चाळीसगावरोड पोलीस ठाण्यात

नोंदवलेल्या आगीच्या तपशीलानुसार, गॅरेजचे मालक दानिश शकील पटेल (रा. आयशा कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे) यांनी पोलिसांत खबर दिली आहे. या आगीत गॅरेजमधील वाहने आणि मशिनरी असे एकूण दहा लाख चाळीस हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यात पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो, महिंद्रा स्कॉर्पिओ, होंडा युनिकॉर्न मोटरसायकल, कार वॉशर, ग्रीस पंप व एअर कंप्रेसर, या वस्तू जळून खाक झाल्या. अग्नीशामन दलाने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पण, तोवर मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पोलीस हवालदार एम. एच. पाटील पुढील तपास करीत आहेत.

महिंदळयात घरफोडी गुन्हा दाखल

धुळे, दि.९- येथील महींदळे परीसरातील डॉक्टरांच्या घरातून चोरट्यांनी एक लाख ४० हजारांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

महिंदळे शिवारात गंगाधाम संबोधी नगरमध्ये डॉ. वैशाली लक्ष्मीकांत बारडकर (आबळे) यांचे निवासस्थान आहे. शुक्रवारी रात्री साडे अकराच्या सुमारास दरवाज्याची कडी व लोखंडी खिडकी तोडुन आत प्रवेश केला. घरातील लाकडी कपाटात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड असा एक लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. त्यात सोन्याचे कानातले, सोन्याचे रिंगा, सोन्याचे काप, **(पान ८ वर)**



शालिनी नटावदकर पतसंस्थेने स्विकारले फेडरेशनचे सभासदत्व

नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- कै. आईसाहेब शालिनी ज.नटावदकर पगारदार कर्मचारी विविध सहकारी सेवा मंडळ संचलित सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, नंदुरबार या पतसंस्थेच्यावतीने महाराष्ट्र राज्य पगारदार पतसंस्थांचे राज्य सहकारी फेडरेशन मर्यादितचे सभासदत्व स्वीकारण्यात आले.

यावेळी **(पान ८ वर)**

सेंट्रींग खचल्याने स्लॅब कोसळला

सा.बां.विभागाचा खुलासा दिशाभूल करणारा नाल्यात पाण्याची गळती अगोदरपासून सुरू होती

धुळे, दि.९-धुळे शहरातील साक्री रोडवर असणाऱ्या मोती नाल्याच्या पुलाचे रुंदीकरण सुरू असताना त्यातील काही भाग कोसळला. ही घटना म्हणजे योगायोगाने घडलेला अपघात असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर आर पाटील यांचे म्हणणे आहे. मात्र या सगळ्या संदर्भात अधिक तपास केला असता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे ही घटना घडली असल्याची आमच्या निदर्शनास



आले आहे.एमजीपीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने पाण्याचा रीसाव अगोदर होत होता व त्या ठिकाणी काही दिवसापूर्वी पाईपलाईनचे काम झाले आहे हे संबंधित विभागाला माहिती होते, असा खुलासा केला आहे.

सिंधी कॅम्पकडे जाणाऱ्या साक्री रोडवरील मोती नाल्यावरील पुलाच्या रुंदीकरणाचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. पुलाचे पिलर्स टाकून झाले आहे. आता सगळ्यात वरचे स्लॅबचे काँक्रीट टाकण्याचे काम टप्प्याटप्प्याने सुरू आहे. चार दिवसापूर्वी स्लॅबचे काँक्रीट टाकण्याचे काम सुरू असताना सेंट्रींग खचल्याने त्यादिवशी आतलेले काँक्रीट पडले.यामुळे मोठ्या प्रमाणात कामाच्या गुणवत्तेविषयी वेगवेगळ्या लोकांनी व पक्षांनी आरोप केले होते.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने खुलासा केला असून मोती नाल्यावरील पुलाचे रुंदी करण्याचे काम सुरू असताना एका स्लॅबचे खाली असणारे सेंट्रींग हळूयामुळे किंवा ते खचल्यामुळे दिनांक ४ नोव्हेंबर **(पान २ वर)**

दिवाळीत फटाक्यांना शासनाकडून ब्रेक आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर निर्णय

मुंबई, दि. ९ : दिवाळीचा उत्साह सुरू असतानाच फटाक्यांच्या आतषबाजीमुळे आगीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ठाणे जिल्ह्यात रॉकेट आणि हवेत उडणाऱ्या तत्सम फटाक्यांच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. आज पासून ८ जानेवारी २०२७ पर्यंत ही बंदी लागू राहणार आहे. ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहेत. दरम्यान, मुंबईतही रॉकेट फटाक्यांवर निर्बंध घालण्याच्या हालचाली सुरू असून, महापालिका प्रशासनाकडून अधिकृत परिपत्रक जारी होण्याची शक्यता आहे.



ठाणे जिल्ह्यात विविध ठिकाणी आगीच्या ११ घटना घडल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. रॉकेट आणि हवेत उडणाऱ्या **(पान ८ वर)**

तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

धुळे, दि.८- मोरदड तांडा (ता. धुळे) येथील तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. समाधान धुला चव्हाण (वय ३०) असे त्याचे नाव आहे. शनिवारी पहाटेपूर्वी घराच्या लोखंडी ऐंगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत निदर्शनास आला. कुटुंबीय, ग्रामस्थांनी खाली उतरवून त्याला सिव्हिल हॉस्पीटल येथे दाखल केले् असता डॉ. बागुल यांनी समाधान धुला चव्हाण यांना मृत घोषित केले. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

जिल्ह्यात चौसष्ट शेतकरी आत्महत्या

मा.आ.प्रा.शरद पाटलांची संकल्पना भाऊबीज निमित्त सांत्वन यात्रेची परंपरा

करण्याची व सांत्वन यात्रा काढण्याची परंपरा त्यांनी गेली २० वर्ष जोपासली आहे. यंदा या प्रथेचे २१ वे वर्ष आहे.



सन २००६ पासून शेतकरी आत्महत्या परिवाराबरोबर भाऊबिज साजरी करण्याची व सांत्वन यात्रा काढून या परिवाराला दिलासा देण्याची परंपरा प्रा.डॉ.शरद पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरु केली. या आत्महत्याग्रस्त परिवाराला शासनाची आर्थिक मदत मिळवून देणे, या परिवारातील विस्तापित झालेल्या अनाथ मुला-मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देणे, या परिवाराला मानसिक आधार देणे असा उपक्रम भाऊबीज सांत्वन यात्रेतुन सुरु ठेवला आहे. यंदा २१ व्या वर्षीही आत्महत्या परिवाराबरोबर भाऊबिज साजरी करुन अशा परिवारातील माता-भगिनींना साडी चोळीचा आहेर देण्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी प्रा.पाटील व सहकारी गावोगावी जाणार आहेत.

साधारणत: शेतीची **(पान २ वर)**

मुलींना आपल्या कुटुंबातील सदस्य समजून नर्सिंग क्षेत्रात घडवा- आ.अमरिशभाई पटेलांच प्रतिपादन

शिरपूर, दि.९- श्रीमती अलका देसाई नर्सिंग कॉलेज मध्ये सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थिनी मुलींना आपल्या कुटुंबातील सदस्य समजून त्यांना नर्सिंग क्षेत्रात घडवावे. विद्यार्थिनींनी देखील नर्सिंगचे शिक्षण घेताना केवळ पदवी मिळविण्यापुरते मर्यादित न राहता सेवाभाव, संवेदनशीलता आणि माणुसकीची भावना जोपासावी. तपनभाई पटेल हॉस्पिटल मध्ये सर्व डॉक्टर्स व अधिकारी यांनी उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आपल्या घरातील सदस्य समजून त्यांची काळजी घ्यावी आणि रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून काम करावे, असे प्रतिपादन श्री विलेपार्ले केळवणी मंडळ अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांनी केले.



श्री विलेपार्ले केळवणी मंडळाच्या (एसव्हीकेएम) श्रीमती अलका देसाई कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, शिरपूर येथे शुक्रवार, दि.६ नोव्हेंबर २०२६ रोजी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित फ्रेशर्स डे कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी आमदार अमरिशभाई पटेल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नर्सिंग क्षेत्रातील संधी, सामाजिक बांधिलकी आणि रुग्णसेवेचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाला एसव्हीकेएम अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन अमरिशभाई पटेल, एसव्हीकेएम कार्यकारिणी सदस्या श्रीमती केतकीबेन मुकेशभाई पटेल, संस्था सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन विश्वस्त कृतिबेन भूपेशभाई पटेल, श्रीमती अलकाबेन देसाई उर्फ कक्कुबेन पटेल, संस्था उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सौ. हिरलबेन चिंतनभाई **(पान २ वर)**

अंक बंद सूचना

दिपावली निमित्त दैनिक आपला महाराष्ट्र कार्यालयास दि.१० व ११ नोव्हेंबर रोजी सुटी असल्याने दि.११ व १२ नोव्हेंबरचा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद घ्यावी. – व्यवस्थापक

सूचना

आजच्या अंकासोबत दैनिक आपला महाराष्ट्रची दिपावली विशेष चार पानांची पुरवणी देत आहोत, याची वाचक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

–संपादक

दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -1,31,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,42,700 रु.+3% GST
चांदी- 1,91,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

सुरांच्या बरसातीत नंदुरबारकर चिंब

स्वरांगण दिवाळी पहाट कार्यक्रमाला रसिकांचा श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नंदुरबार, दि.९- दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात भक्तिसंगीत, भावगीत, नाट्यगीत आणि बहारदार नृत्याविष्काराच्या सुरेल संगमाने करत नंदुरबारकर रसिकांनी स्वरांगण दिवाळी पहाट या सांगीतिक कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने सोमवार, दि. नोव्हेंबर रोजी पहाटे श्रीमती हि.गो. शॉफ हायस्कूल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन नादब्रह्म संगीत साधना विद्यालयाच्या संचालिका तथा ज्येष्ठ गायिका सौ. सुनीता चव्हाण आणि नंदुरबार नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व नटराज पूजन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दीपक अंधारे, मनीष शहा, चंद्रशेखर चव्हाण, लायन्स क्लबचे अध्यक्ष ड. किरण पाटील, अनिल पाटील, डॉ. श्रीराम दाऊतखाने, सारंग रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रवर्णा प्रशांत जगताप हिने घनश्याम सुंदरा या अजरामर गीतावर बहारदार भरतनाट्यम नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. गौतमी थोरात हिनेही आपल्या नृत्याविष्कारातून कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर सुरू झालेल्या संगीत मैफलीत स्वर साज़ म्यूझिकल ग्रुप नंदुरबार च्या गायकांनी एकापेक्षा एक सरस गीतांची सुरेल मेजवानी रसिकांसमोर सादर केली. स्वप्नील खैरनार यांनी सूर निरागस हो, मन लागो रे लागो रे, हे सुरांनो चंद्र व्हा आणि भेटला विठ्ठल माझा या गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. विजय पाटील यांनी मबाजे रे मुरलिया बाजेफ पंढरीचे भूत मोठे आणि सजना नयना नीत धार बरसती या **(पान ८ वर)**

प्रभात सूर्यवंशी गुणवत्ता यादीत



शहादा, दि.९(का.प्र.)- येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित विषयाच्या गुणवत्ता यादीत तृतीय स्थान प्राप्त झाले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने एप्रिल-मे २०२६ मध्ये घेतलेल्या विविध परीक्षांपैकी बी.एस्सी. गणित विषयात पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य वरिष्ठ **(पान २ वर)**

समाजातील काही घटकांना फराळ वाटप जोशाबा सांस्कृ. क्रीडा मंडळाचा उपक्रम

सोनगीर दि.९ (प्रतिनिधी)- येथील जोशाबा सांस्कृतिक क्रीडा मंडळातर्फे अंध, दिव्यांग, ऊसतोड कामगार, गरीब, गरजू, निराधार, वंचित, भटके अशा २०१ कुटुंबियांना दिवाळी सणानिमित्त प्रत्येकी एक किराणा किट व पंचायत समितीचे माजी सदस्य अविनाश महाजन यांच्यातर्फे ६० एकल महिलांना भाऊबीजनिमित्त साडी-चोळी व फराळ वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ग्रामपंचायतीच्या वेबसाईटचे लोकार्पण करण्यात आले.



ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. जगदीश आर गिंदोडिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी गणेश चौधरी, सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त संजय सैंदाणे, प्रशासक एच. डी. महंत, गटनेते अविनाश महाजन, माजी सरपंच लखन ठेलारी, केदारेश्वर मोरे, ग्रामपंचायत अधिकारी मेघश्याम बोरसे, अल्ताफ कुरेशी, शफीयोद्दीन पठाण, इरफान कुरेशी, बालाजी मंदिराचे मुकुंद भंडारी,प्रकाश गुजर, गोरख पाटील, उत्तम महाजन, अनिल पाटील **(पान ८ वर)**

आपला महाराष्ट्र

फटाके : न्यायालयाचे निर्देश धाब्यावर

दिवाळीपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने रस्त्यावर आणि सार्वजनिक ठिकाणी फटाके उडविण्यास केली होती. एका याचिकेवर निर्देश देताना न्यायालयाने असे भाष्य केले होते. परंतु त्याबाबत सरकारने कुठलीही कार्यवाही केली नाही. फटाके फोडण्याबाबतचे कोणतेही निकष ठरविण्यासाठी पावले उचलली नाहीत. याचिकाकर्त्यांचे या आदेशाबद्दल समाधान झाले असले तरी त्यासंबंधीचे निष्कर्ष मात्र शून्य निघाले. न्यायालयाने काहीही सांगितले तरी ही बाब आमच्या आवाजाच्या बाहेरची आहे असे जणू सरकार आणि सरकारच्या यंत्रणेने गृहीत धरले होते त्यामुळे न्यायालयाच्या निकालावर सरकारने कुठलीही कार्यवाही केली नाही. परिणामी दिवाळीच्या दिवशी म्हणजेच लक्ष्मीपूजना नंतर शहरात जी आतिषबाजी झाली ती लक्षात घेता जाहीर झालेली दुष्काळी परिस्थिती लोकांनी धाब्यावर बसविली तद्वतच न्यायालयाचे निर्देशही धाब्यावर बसविले होते. रात्री बारा वाजेपर्यंत अखंडपणे फटाक्यांचे आवाज शहराच्या अवकाशात घुमत होते. शरीराला बाधक अशा धुरांचे लोट देखील आकाशात दिसत होते. दुष्काळामुळे ग्रामीण भागातही फटाके किंवा आतिषबाजी झालीच नाही असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. याचाच अर्थ असा आहे की सणावारांच्या प्रचंड उत्साहात कोणालाच बांध राहिलेले नाही असेच दिसले. शहरी जीवनात फटाके हे मोठ्या प्रमाणावर, घातक आणि सातत्याने परिणाम करणारे आणि प्रदुषण निर्माण करणारे बनले असले तरी त्यावर कुणाचेच नियंत्रण नव्हते. ध्वनी आणि वायुप्रदूषणाची होते धोकादायक कशी नियंत्रित करता येतील यावर कमी प्रदूषण करणारे हरित फटाके हा एक पर्याय पुढे आला आहे. नागपूरच्या एका वैज्ञानिक संस्थेने हरित फटाक्यांची निर्मिती केलेली आहे.कमी प्रदुषण,आवाजाच्या मर्यादा आणि हवेत त्यांचा धूर साचून राहणार नाही असे हे फटाके आहेत.पण त्यांचा फारसा प्रसार झाला नाही.शिवाय हा उपाय प्रतिकात्मक ठरला.अशा प्रतिकात्मक उपायांनी फटाक्यांच्या समस्येवर मात करता येणार नाही.असेही दिसून आले आहे.

दिवाळीत फटाक्यांच्या वापरामुळे वायुप्रदूषण वाढते, ही चिंता काही नवीन नाही. या समस्येवर उपाय म्हणून कमी उत्सर्जन करणारे हरित फटाके विकसित करण्यात आले मात्र, एक महत्त्वाचा प्रश्न अजूनही कायम आहे. एखाद्या फटाक्यातून पूर्वीच्या तुलनेत कमी प्रदूषण बाहेर पडत असेल, तर त्यामुळे शहरातील हवा स्वच्छ राहील याची खात्री देता येणार नाही. फटाक्यांच्या रासायनिक रचनेत या प्रश्नाचे उत्तर नाही. तर उत्सर्जनाचे एकूण प्रमाण, हवामान, प्रदूषणाचे अन्य घटक आणि हवेच्या गुणवत्तेच्या निरीक्षणातून मिळणाऱ्या आकडेवारीत हे उत्तर आहे.

फटाके पेटवल्यानंतर रासायनिक धूर बाहेर पडतो.ती एक प्रकारे प्रक्रियाच म्हणावी लागेल त्यातून उर्जेची निर्मिती होते.याच ऊर्जेमुळे प्रकाश, रंग आणि आवाज निर्माण होतो. या प्रक्रियेदरम्यान फटाक्यांमध्ये वापरलेले जे रासायनिक पदार्थ असतात,सूक्ष्म कण, वायु आणि धातूंचे कण हवेत मिसळतात. हे कण अतिशय सूक्ष्म असल्यामुळे श्वास नलिकेत खोलवर पोहोचू शकतात. त्यामुळे हृदय आणि फुफ्फुसांशी संबंधित अनेक आरोग्यसमस्या निर्माण होऊ शकतात.

फटाक्यांमधून बाहेर पडणारे कण हवेत आधीपासून असलेल्या वाहनांच्या धुरात, औद्योगिक प्रदुषणात आणि धुळीत मिसळू शकतात. त्यामुळे हवेच्या गुणवत्तेवर एकाच वेळी अनेक प्रदूषण निर्माण करणाऱ्या पदार्थांचा परिणाम होतो. दिवाळीच्या काळात आतिषबाजी मुळे प्रदूषणात अतिरिक्त भर पडू शकते. मात्र, त्या काळात मोजले जाणारे एकूण प्रदूषण केवळ फटाक्यांमुळेच झाले आहे, असे मानणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरणार नाही.असाही एक मत प्रवाह आहे.

कारण प्रदूषणाच्या वेगवेगळ्या निर्मितिवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजनाही वेगवेगळ्या असतात. फटाक्यांमधून होणारे उत्सर्जन कमी करणे उपयुक्त ठरू शकते; परंतु त्यामुळे वाहनांचे उत्सर्जन, औद्योगिक प्रदूषण किंवा उघड्यावर जैविक पदार्थ जाळल्यामुळे होणारे प्रदूषण आपोआप संपत नाही.प्रदुषणाचे घटक हवेत मिसळल्यानंतर ते एखाद्या परिसरात किती काळ टिकून राहतील, हे हवामान आणि स्थानिक परिस्थितींवर अवलंबून असते. वातावरणातील अनेक घटक किती काळ हवेत टीकून राहतात आणि हवेचा वेग किती आहे यावरही ते अवलंबून असते.

वेगवान वाऱ्यामुळे प्रदुषण निर्माण करणारे घटक दूरवर पसरतात आणि एखाद्या ठिकाणी त्यांची घनता कमी होऊ शकते वैज्ञानिक तथा औद्योगिक संशोधन परिषदे अंतर्गत कार्यरत राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेने अर्थात निरीने अशा प्रकारच्या फटाक्यांची निर्मिती केली आहे. पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत त्यातून बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म कणांचे प्रमाण कमी करण्याचा प्रयतक या तंत्रज्ञानात करण्यात आला आहे. त्या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार विकसित करण्यात आलेल्या हरित फटाक्यांच्या काही प्रकारांमध्ये सूक्ष्म कणांच्या उत्सर्जनात सुमारे ३० ते ४० टक्के घट झाल्याचे सांगण्यात आले आहे. ही निश्चितच उपयुक्त प्रगती आहे. मात्र, तिचा अर्थ समजून घेण्यासाठी कोणत्या उत्पादनाशी तुलना करण्यात आली, कोणत्या प्रकारचे उत्सर्जन मोजण्यात आले आणि चाचण्या कोणत्या परिस्थितीत घेण्यात आल्या, हे जाणून घेणे आवश्यक आहे. एखाद्या उत्पादनातून सूक्ष्म कणांचे उत्सर्जन कमी झाले, याचा अर्थ सर्व प्रकारच्या प्रदुषण करणाऱ्या घटकात तेवढीच घट झाली आहे, असा होत नाही.कमी उत्सर्जन करणाऱ्या फटाक्यांचा प्रत्यक्ष फायदा तेव्हाच मिळू शकतो, जेव्हा बाजारात उपलब्ध असलेली उत्पादने निर्धारित मानकांनुसार तयार केलेली असतील. केवळ एखाद्या पाकिटावर हरित असे लिहिलेले असणे पुरेसे नाही.सेंद्रिय धान्य,सेंद्रिय पदार्थ,सेंद्रिय गूळ,सेंद्रिय हळद सेंद्रिय असतेच असे काही नसते.सेंद्रिय लिहिलेले असणे आणि प्रत्यक्षात वस्तू सेंद्रिय असणे यात फरक आहे. त्यावर कुणाचे नियंत्रण नाही.तसे फटाक्यांचे आहे.नीरी ही संस्था हरित फटाक्यांच्या चाचण्या आणि प्रमाणपत्र देण्याचे काम करते. उत्पादक आणि प्रमाणपत्रांशी संबंधित माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाते.मात्र फटाके प्रत्यक्षात हरित आहेत का याबद्दलची खात्री कशी करणार असा प्रश्न आहे. म्हणून त्यांची तपासणी किंवा नियमन करणाऱ्या ज्या सरकारी संस्था आहेत त्यांनीहीनियमांचे पालन होत आहे की नाही, यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. चुकीचे दावे करणाऱ्या किंवा अधिकृत परवानगी नसलेल्या उत्पादनांविरोधात कारवाई करणेही महत्त्वाचे आहे.

सप्टेंबर २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका आदेशात निश्चित अटींच्या अधीन राहून नव्या पिढीतील हरित फटाक्यांना परवानगी देण्यासंबंधीच्या तरतुदी मान्य करण्यात आल्या आहेत. यामध्ये चाचण्या, प्रमाणपत्रे, परवानाधारक उत्पादक, उत्सर्जन आणि सुरक्षेचे निकष तसेच प्रतिबंधित रसायनां संबंधीच्या अटींचा समावेश होता.

यावरून या विषयात वैज्ञानिक चाचण्या आणि नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे स्पष्ट होते.

प्रदुषणा संबंधी दिवाळीपूर्वीचे, दिवाळीदरम्यानचे आणि दिवाळीनंतरचे आकडे एकमेकांशी तुलना केल्यास प्रदूषण कधी वाढले आणि किती काळ टिकून राहिले, हे समजू शकेल. मात्र, केवळ एका दिवसाच्या आकडेवारीवरून संपूर्ण परिस्थिती स्पष्ट होत नाही.सामूहिक उत्सवांमध्ये मर्यादित आतषबाजी करणे आणि त्याऐवजी प्रकाशयोजनेचे अन्य पर्याय स्वीकारणे शक्य आहे. त्यामुळे उत्सवाचे सामाजिक स्वरूप आणि आनंद कायम ठेवतानाच प्रदूषणकारी कृती कमी करता येणे शक्य आहे.स्वच्छ हवा आणि वातावरण निकोप ठेवण्याची जबाबदारी कुणा एकट्याची नाही.सरकारचीही एकट्याची असू शकत नाही.ती सामुदायिक जबाबदारी आहे.ती जर पार पाडली नाही तर आसपास सगळे रोगटच दिसतील.

आर.सी.पटेल महा.त नशामुक्त अभियान

शिरपूर, दि.९- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी नशामुक्त अभियान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात विशेष अतिथी डॉ. नागोराव डोंगरे यांनी मव्यसनाधीनता आणि तरुणांचे मानसिक आरोग्यफ या विषयावर व्याख्यान दिले. उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी व्यसनाच्या मूळ मानसशास्त्रीय कारणांवर सविस्तर प्रकाश टाकला. आजचा तरुण वर्ग विविध कारणांमुळे नशा व व्यसनाच्या आहारी जात आहे. या समस्येचे मानसशास्त्रीय विश्लेषण करताना हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, व्यसन ही केवळ शरीराला लागलेली सवय नसून, ती एक अत्यंत गंभीर मानसिक आणि भावनिक समस्या आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात तरुणांवर अभ्यासाचा प्रचंड ताण, नैराश्य, मित्रांचा दबाव किंवा स्वतःच्या भावनांवर नियंत्रण नसणे यांसारख्या गोष्टींचा मोठा प्रभाव असतो. आयुष्यातील संकट वा अपयशाला सामोरे जाताना व्यसनाची वाट न धरता, समस्येवर मात करण्याचा सकारात्मक व तणावमुक्त दृष्टिकोन तरुणांनी अंगीकारला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. सुधाकर चौधरी यांनी कार्यशाळा आयोजनामागची भूमिका विषद केली. वाढत्या व्यसनाधीनतेला अटकाव घालणे आणि तरुण पिढीला या घातक सवयींपासून परावृत्त करून त्यांचे योग्य मानसशास्त्रीय प्रबोधन करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थी विकास विभागाचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. विवेकानंद चव्हाण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विद्यापीठाची भूमिका विशद करून या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना विविध सकारात्मक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयापासून भरकटू नये. शिक्षण आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करून निरोगी समाज निर्मितीत आपले योगदान द्यावे असे सांगितले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, डॉ. रमेश जाधव, प्रा. आनंद माहेश्वरी (विद्यार्थी विकास विभाग) उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. अतिराम पावरा यांनी व आभारप्रदर्शन डॉ. आर. आर. वसावे यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या समन्वयाची जबाबदारी प्रा. मिलिंद बचुटे यांनी यशस्वीरीत्या सांभाळली.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

प्रा. महेश भावसार ना पीएच.डी.पदवी



शिरपूर, दि.९- आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट (आय. एम. आर. डी.) येथील सहाय्यक प्राध्यापक महेश किशोर भावसार यांना जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेमार्फत पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली.


त्यांनी अ स्टडी ऑन बायिंग परसेप्शन अँड सटिस्फॅक्शन टुवर्ड्स ऑनलाइन शॉपिंग थ्रू एम-कॉमर्स अमंग वर्किंग विमेन विथ रेफरन्स टू धुळे अँड नंदुरबार डिस्ट्रिक्ट या विषयावर शोधप्रबंध सादर केला. संशोधनात धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील नोकरदार महिलांची एम-कॉमर्सद्वारे होणाऱ्या ऑनलाइन खरेदीविषयीची धारणा, खरेदीचा अनुभव आणि ग्राहक समाधान या बद्दल अभ्यास केला. महेश भावसार यांनी त्यांच्या पीएच.डी. संशोधन कार्यांतर्गत शोधप्रबंधांचे सादरीकरण ८ सप्टेंबर २०२६ रोजी ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण केले.

सदर संशोधनासाठी त्यांना सिस्टेल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च, धुळे येथील संचालक डॉ. हंसराज मधुकर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. पीएच.डी.च्या अंतिम मौखिक परीक्षेसाठी डॉ. पवित्रा डी. पाटील (स्कूल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, कबचौ उमवि, जळगाव) यांनी अध्यक्ष म्हणून, डॉ. नितीन के. चौधरी यांनी बाह्य परीक्षक म्हणून, डॉ. हंसराज एम. पाटील यांनी अंतर्गत परीक्षक व संशोधन मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.

त्यांच्या या यशाबद्दल माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



प्रकाश में ता.१२- धर्मा



नविन निश्चल रेखा अजीत प्राण बिंदु मदन पुरी रमेश देव

प्रकाश में आज- चोर होतो ऐसा



शत्रुघ्न सिन्हा रीना रॉय प्राण मदन पुरी बिंदु रजा मुराद अनवर हुसेन मैक मोहन जगदीशराज

प्रकाश में ता.११- शंकर शंभु



फिरोज खान सुलक्षणा पंडीत विनोद खन्ना बिंदु अजीत अनवर हुसैन

पान १ वरुन

सा.बां.विभागाचा खुलासा दिशाभूल करणारा

रोजी काँक्रीट ओतलेला भाग खचला.यामागे कारण देताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे की,ज्या ठिकाणी काम सुरू होते त्याचे वरचे बाजूला मनपाची पाईपलाईन फुटून ते पाणी सेंट्रींगच्या खालून जिरपल्याने जमिनीत ओलावा निर्माण झाला. वजन आल्यानंतर ते सेंट्रींग खचले. हा निव्वळ अपघात होतात.जो वेळीच लक्षात आला व काम थांबवण्यात आले. यामध्ये कोणालाही इला इजाज आली नाही. पर्यावेक्षकीय यंत्रणा सतर्क असल्यामुळे अनर्थ टाळला असा खुलासा अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी केला आहे.या कामात कोणतीही अनियमित्ता करण्याचे उद्देश नव्हता.ही घटना सेंट्रींग खचल्यामुळे झालेली आहे.ही बाब दुर्दैवी आहे, याची सर्व जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली आहे. या सेंट्रींग असलेल्या स्लॅबचे सर्व उभारणी व बांधणी नव्याने करून ७ नोव्हेंबरला नव्याने स्लॅब काँक्रीट करण्यासाठी पूर्ण केला आहे.पुलाचे बांधकाम संकल्प चित्र मंडळ मुंबई यांच्याकडील टाईप प्लॅन नुसार व त्यांच्या प्रमाणीकरणांनुसार स्टील टाकण्यात आलेले आहे अशा आशयाचा खुलासा करण्यात आला आहे.

बांधकाम विभागाचे दुर्लक्ष परिस्थितीला जबाबदार

या बातमीचा नीट मागोवा घेतला असता एमजेपी कडे चौकशी केली. एका बड्या अधिकाऱ्याने स्पष्ट केले की,मोतीनाल्यामधील ही पाईपलाईन ८०० एम एम ची असून काही दिवसापूर्वी ती फुटली होती. हनुमान टेकडी ते शिवस्मारकापर्यंत ही पाईपलाईन येते.पुढे ती बडगुजर प्लॉटकडे असणाऱ्या पाण्याच्या टाक्यांकडे जाते. पुलाचे काम सुरू असताना हा प्रकार घडला होता. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विभागात किंवा ठेकेदारांना याबाबत कोणतीही माहिती नव्हती हे म्हणता येणार नाही. पाईपलाईनवर काँक्रीट असल्यामुळे ती फोडून दुरुस्त करण्यात आले व नव्याने काँक्रिटीकरण करण्यात आले. मात्र काही दिवसांनी पुन्हा तिथून पाण्याची गळती व्हायला सुरुवात झाली. या कामाला पुन्हा वेळ लागणार असल्याने व सणासुदीचे दिवस असल्यामुळे एमजेपी तर्फे त्या दुरुस्तीचा कार्यक्रम हा दिवाळीनंतर ठेवण्यात आला आहे. पाणी गळत होते हे सर्वांना माहिती असताना त्याबाबत कोणतीही लेखी तक्रार पीडब्ल्यूडीने आमच्या विभागाकडे का केला नाही? भर समुद्रामध्ये पूल उभा राहू शकतो. हा तर नाला होता.उलट योग्य दक्षता घेतली गेली असती तर जमीन खचण्याचा प्रश्नच राहिला नसता,असे संबंधिताने आमच्याशी बोलताना स्पष्ट केले.

या सगळ्यातून एकच गोष्ट उघड झाली आहे की,ज्या अधिकाऱ्यांवर या कामाच्या देखरेखीची जबाबदारी दिली होती त्यांनी पुलाखाली जाऊन ज्या ठिकाणी सेंट्रींग उभे केलेले आहे त्या ठिकाणची जमीन संबंधित ठेकेदाराने आपल्या खर्चाने डब्ल्यूबीसी करून अथवा काँक्रिटीकरण करून सेंट्रींगची जागा भक्कम केली आहे का नाही हे बघितलेच नाही. सेंट्रींग ठेकेदाराने देखील माणसांच्या भरोसे राहून योग्य ती तपासणी केली नाही. अधिकाऱ्यांनी वरच्यावर सळया तपासल्या, मात्र खाली जाऊन सेंट्रींग तपासले नाही.या चुकीमुळे हे सेंट्रींग खचले. परिणामी त्यादिवशी टाकण्यात आलेल्या स्लॅबचा भाग कोसळला. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचा खुलासा म्हणजे वेळ मारून नेण्याचा प्रयतक आहे. देखरेखीवर आपण कमी पडलो असल्याचे निदर्शनास येऊ नये यावर पडदा पडावा असा प्रयतक असल्याचे दिसते. सरकारी कामांचे ठेके देताना टक्केवारीच्या पुढे जाऊन आता अधिकारी थेट भागीदारी करायला लागले असल्यामुळे हा विषय अधिक चर्चेचा जाऊ नये हा देखील त्यांचा प्रयतक असावा असे दिसते.

मा.आ.प्रा.शरद पाटलांची संकल्पना

नापिकी, शेतीला जोडधंद्याची साथ नसणे, उत्पादीत शेतमालाला हमीभाव न मिळणे, शेती करणाऱ्या परिवाराकडे पर्यायी जोडधंदा व बागायतीसाठी पाण्याची व्यवस्था नसणे, तसेच शेतीला होणारा अर्थ पुरवठा अल्प स्वरुपात असणे, याशिवाय निसर्गाचा लहरीपणा, गारपीट, कोरडा दुष्काळ, पिकावरील रोगराई, महागडी खते, बी-बियाणे, वाढलेले मजुरीचे दर, स्थानिक बाजारपेठ उपलब्ध नसणे, कुटुंबावर वाढलेला आर्थिक भार, शासकीय योजनांमधील दोष आणि त्यातून शेतकऱ्यांना आलेले नैराश्यामुळे शेतकरी आत्महत्या होत असल्याचा निष्कर्ष या शोधनिबंधात मांडून काही महत्वपूर्ण उपाययोजना प्रा.पाटील यांनी सुचविलेल्या आहेत.

माहे नोव्हेंबर २०२५ ते ऑक्टोबर २०२६ या काळात

धुळे जिल्ह्यात झालेल्या एकूण शेतकरी आत्महत्या ६४ झाल्यसा आहेत. त्यात धुळे तालुका ३३, शिंदखेडा तालुका २०, साक्री तालुका ८, शिरपूर तालुका ३ चा समावेश आहे. या आत्महत्येपैकी पात्र आत्महत्या प्रकरणे २८, अपात्र ठरविलेली प्रकरणे १०, प्रलंबित असलेली प्रकरणे २२, गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजनाकडे वर्ग केलेली आत्महत्या प्रकरणे-४.

एकूण ६४ आत्महत्यांपैकी १ आत्महत्या करणारी महिला शेतकरीची असून प्रलंबित प्रकरणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे बैठकी अभावी प्रलंबित आहेत. तर काही अपात्र प्रकरणांची फेर चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी प्रा.डॉ.शरद पाटील यांनी केली आहे.

प्रभात सूर्यवंशी गुणवत्ता यादीत

महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रभात जयदेव सूर्यवंशी याने घव-घवीत यश संपादन केले आहे. हा विद्यार्थी बी.एस्सी. गणित विषयात विद्यापीठातून तृतीय आला आहे.या विद्यार्थ्यास गणित विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर सुतार, डॉ. गजानन पाटील, प्रा.जगदीश पाटील, प्रा.भाग्यश्री बोरदे व प्रा.कविता गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या यशाबद्दल पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, मानद सचिव जयश्रीताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, संस्थेचे संचालक मयूर पाटील व प्राचार्य डॉ. एम. के. पटेल यांनी अभिनंदन केले आहे.

पान १ वरुन

मुलींना आपल्या कुटुंबातील सदस्य समजून नर्सिंग

पटेल, प्रथ चिंतनभाई पटेल, तथ्य चिंतनभाई पटेल, गोपाल भंडारी, राजेश मुनोत, डॉ. संतोष पवार, श्रीमती ओबेरॉय, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुभाषिनी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, माजी जिल्हा परिषद सदस्य, माजी पंचायत समिती सदस्य, नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

असंख्य युवक-युवतींना शिक्षण व रोजगाराच्या संधी

आमदार अमरिशभाई पटेल पुढे म्हणाले की, शिरपूर तालुक्यातील अनेक आदिवासी व असंख्य युवक-युवतींना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून होत आहे. गुणवत्तेच्या आधारावर विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना रोजगाराच्या संधी दिल्या जात आहेत. आज तालुक्यातील अनेक आदिवासी युवक-युवती विविध क्षेत्रांत नोकरी करीत असून, ही समाधानाची बाब आहे. नर्सिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील गरजू आणि वंचित घटकांच्या सेवेसाठी करावा. नर्सिंग महाविद्यालयासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या गुजर कुटुंबाच्या योगदानाचा उल्लेख करत त्यांनी या सभागृहाला जगन्नाथ रामू गुजर यांचे नाव देण्याची घोषणा केली. तसेच स्व. लोटनभाई गुजर यांचे संस्थेवर आणि शैक्षणिक उपक्रमांवर विशेष प्रेम असल्याचे सांगून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिरपूर तालुक्यात आरोग्यसेवेच्या क्षेत्रात सातत्याने प्रगती होत असून, भविष्यात रुग्णालयात कर्करोगावरील अत्याधुनिक उपचार सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचेही त्यांनी नमूद केले. चांगले काम करणाऱ्यांचे कौतुक करण्याची वृत्ती समाजात निर्माण झाली पाहिजे. कोणतेही चांगले काम झाले तर त्याचे मनापासून कौतुक करायला शिका, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी शिरपूर तालुक्यातील शैक्षणिक प्रगतीचा उल्लेख करताना आमदार अमरिशभाई पटेल यांनी सांगितले की, आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलातील तालुक्यातील पेक्षा अधिक विद्यार्थी डॉक्टर म्हणून कार्यरत आहेत. यंदाही विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळाला आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्यावी. शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे.

प्रत्येक घरासमोर वृक्षारोपण करून शिरपूर हिरवेगार करू या

पर्यावरण संवर्धनाचा विषय मांडताना आमदार अमरिशभाई पटेल यांनी आमदार, सर्व पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींना तालुकाभरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले. प्रत्येक घरासमोर किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी नागरिकांनी स्वीकारावी. शहर आणि संपूर्ण तालुका हिरवागार करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयतक करावेत, असे ते म्हणाले. नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांनीही वृक्षारोपण मोहिमेवर भर देत प्रत्येक घरासमोर वृक्षलागवड करण्याच्या उपक्रमाला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

आदिवासी मुलींचा नर्सिंग शिक्षणाकडे वाढता कल : आ.काशिराम पावरा

आमदार काशिराम दादा पावरा यांनी आपल्या मनोगतात नर्सिंग महाविद्यालयाच्या माध्यमातून आदिवासी भागातील मुला-मुलींना मिळणाऱ्या शैक्षणिक संधींचे विशेष कौतुक केले. पूर्वी आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी हैद्राबाद सारख्या दूरच्या ठिकाणी जावे लागत असे. मात्र, आता भाईंमुळे शिरपूरमध्येच दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे विशेषतः आदिवासी मुली मोठ्या संख्येने नर्सिंग शिक्षणाकडे वळत आहेत, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

नर्सिंग क्षेत्रात महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असून, विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने शिक्षण पूर्ण करून स्वतःच्या पायावर उभे राहावे. संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाचे, तालुक्याचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले.

भूपेशभाई पटेल यांचे मार्गदर्शन :

एसव्हीकेएमचे सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत शिस्त, मेहनत आणि सेवाभाव या गुणांचे महत्त्व पटवून दिले. नर्सिंग हा केवळ व्यवसाय नसून रुग्णांच्या वेदना समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे पवित्र कार्य आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी करावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुभाषिनी यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा आणि नर्सिंग शिक्षणातील विविध संधींची माहिती दिली. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना महाविद्यालयीन जीवनात आत्मविश्वासाने वाटचाल करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी राजेश मुनोत यांनी मनोगत व्यक्त करताना भाईंनी बहीण श्रीमती अलका देसाई यांच्या नावाने महाविद्यालय सुरू केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. शिरपूरकरांचे भाग्य मोठे असून, अमरिशभाई पटेल यांच्यासारखे नेतृत्व लाभल्याने शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात तालुक्याची प्रगती होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच राजेश मुनोत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. फ्रेशर्स डेच्या निमित्ताने नवीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी परिचित होण्याची, वरिष्ठ विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. नव्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

शब्दकोडे क्रमांक.२४८९

१	२	३		■	४	५	६		■	७	
८			■	९				■	१०		■
	■	११			■		■	१२	■	१३	
■	१४		■	१५	१६	■	१७		१८		■
१९		■	२०	■	२१		■	२२		■	२३
२४			■	२५		■	२६	■	२७	२८	
■		■	२९		■	३०		३१	■	३२	
३३	■	३४		■	३५		■	३६	३७	■	
३८		■	३९				४०	■	४१		■
	■	४२		■		■	४३	४४		■	४५
■	४६		■	४७		४८	■	४९		५०	
५१		■	५२		■



बलिप्रतिपदा आणि दिवाळी पाडवा

समृद्धीचा संकल्प, नात्यांचा सन्मान आणि नव्या पर्वाची मंगल सुरुवात!

दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि आनंदाचा उत्सव नाही, तर भारतीय संस्कृतीतील जीवनमूल्यांची जपणूक करणारा संस्कारांचा महोत्सव आहे. दिवाळीतील बलिप्रतिपदा आणि दिवाळी पाडवा हा दिवस धार्मिक श्रद्धा, आध्यात्मिक विचार, कुटुंबातील प्रेम, परस्परांचा सन्मान आणि समृद्ध जीवनाचा संदेश देणारा आहे. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला साजरा होणारा हा सण नव्या आशा, नव्या संकल्पना आणि नव्या सुरुवातीचे प्रतीक मानला जातो. या दिवसामागे दडलेला विचार केवळ परंपरेपुरता मर्यादित नसून आजच्या आधुनिक जीवनालाही दिशा देणारा आहे.

धार्मिक महत्त्व : राजा बळीच्या उदारतेचा आणि वचनपालनाचा आदर्श


बलिप्रतिपदेच्या दिवशी राजा बळीचे स्मरण केले जाते. पुराणकथेनुसार राजा बळी हा अत्यंत पराक्रमी, दानशूर आणि प्रजाहितदक्ष राजा होता. त्याच्या दानशूरपणाची परीक्षा घेण्यासाठी भगवान विष्णूंनी वामन अवतार धारण केला. वामनाने बळीकडे तीन पावलांइतकी भूमी मागितली. बळीने दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. भगवान विष्णूंनी त्याच्या त्यागाने आणि वचननिष्ठेने प्रसन्न होऊन त्याला पाताळाचे राज्य दिले आणि वर्षातून एक दिवस आपल्या प्रजेला भेटण्याची अनुमती दिली, अशी पौराणिक श्रद्धा आहे. त्यामुळे बलिप्रतिपदा हा दिवस दान, त्याग, वचनपालन, नम्रता आणि प्रजाहित या मूल्यांची आठवण करून देतो. सत्तेपेक्षा सेवा मोठी आणि संपत्तीपेक्षा माणुसकी श्रेष्ठ असते, हा राजा बळीच्या कथेतून मिळणारा महत्त्वाचा संदेश आहे.

आध्यात्मिक महत्त्व : अहंकाराचा त्याग आणि अंतर्मनातील प्रकाश

बलिप्रतिपदेचा आध्यात्मिक अर्थ अधिक व्यापक आहे. राजा बळीच्या कथेतून माणसाने आपल्या अहंकारावर विजय मिळवावा, आपल्या सामर्थ्याचा उपयोग इतरांच्या कल्याणासाठी करावा आणि जीवनात नम्रता जपावी, ही शिकवण मिळते. माणसाकडे किती संपत्ती आहे, किती अधिकार आहेत किंवा किती मोठे पद आहे, यापेक्षा त्याच्या मनात किती करुणा, उदारता आणि परोपकाराची भावना आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे. खऱ्या अर्थाने दिवाळी तेव्हाच साजरी होते, जेव्हा बाहेरील दिव्यांबरोबरच मनातील द्वेष, मत्सर, अहंकार आणि नकारात्मक विचारांचा अंधारही दूर होतो. स्वतःच्या प्रगतीबरोबर दुसऱ्याच्या आनंदाचाही विचार करणे, हाच या दिवसाचा खरा आध्यात्मिक संदेश आहे.

दिवाळी पाडवा : पती-पतकीच्या नात्यातील प्रेम, विश्वास आणि सन्मानाचा दिवस

महाराष्ट्रात दिवाळी पाडव्याला विशेष सांस्कृतिक महत्त्व आहे. व्यापारी वर्गासाठी हा दिवस नववर्षाची सुरुवात आणि आर्थिक व्यवहारांच्या नव्या पर्वाचा मानला जातो. व्यापारी मंडळी आपल्या दुकानात लक्ष्मी-कुबेर पूजन करून नव्या हिशेबवह्यांची सुरुवात करतात. कुटुंबव्यवस्थेतही या दिवसाला महत्त्वाचे स्थान आहे. पतकी पतीला औक्षण करते, तर पती पतकीला भेटवस्तू देऊन तिच्याप्रती प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करतो. या परंपरेचा



खरा अर्थ केवळ औक्षण किंवा भेटवस्तू देण्यापुरता नाही. संसाराच्या प्रवासात एकमेकांना साथ देणे, परस्परांच्या भावना समजून घेणे, सुख-दुःखात खंबीरपणे उभे राहणे आणि एकमेकांच्या अस्तित्वाचा सन्मान करणे, हा या सणामागील सुंदर भावार्थ आहे.

आजच्या काळातील सुसंगती : संपत्तीपेक्षा समाधान आणि नात्यांपेक्षा मोठे काहीच नाही!

आजचे जीवन अत्यंत वेगवान झाले आहे. नोकरी, व्यवसाय, स्पर्धा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे माणसाकडे सुखसोयी भरपूर आहेत; परंतु कुटुंबासाठी वेळ मात्र कमी होत चालला आहे. अशा परिस्थितीत बलिप्रतिपदा आणि दिवाळी पाडवा आपल्याला थांबून स्वतःकडे पाहण्याची संधी देतात. राजा बळीची दानशूरता आजच्या समाजात सामाजिक बांधिलकीच्या रूपाने जपता येईल. गरजू विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणे, एखाद्या वृद्धाला आधार देणे, गरिबाच्या घरात आनंदाचा दिवा लावणे किंवा एखाद्या निराश व्यक्तीला प्रोत्साहन देणे, हीच आधुनिक काळातील खरी दानशूरता ठरू शकते. दुसरीकडे पाडव्याच्या निमित्ताने कुटुंबातील नात्यांना वेळ देणे, पती-पतकीने एकमेकांच्या कार्याचा गौरव करणे, मुलांशी संवाद साधणे आणि ज्येष्ठांचा आशीर्वाद घेणे या गोष्टींना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

हा दिवस कसा साजरा करावा? आनंदाबरोबर सामाजिक भानही जपावे!

या दिवशी घराची स्वच्छता करून सुंदर रांगोळी काढावी, पणत्या लावाव्यात, कुटुंबासह देवपूजा करावी आणि घरातील ज्येष्ठांचे आशीर्वाद घ्यावेत. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर चांगल्या कामाचा संकल्प करावा. अनावश्यक खर्च, दिखाऊपणा आणि स्पर्धात्मक खरेदी टाळून गरजेपुरती खरेदी करावी. फटाक्यांचा अतिरेक टाळावा, पर्यावरणाची काळजी घ्यावी आणि स्थानिक कारागीर, कुंभार, छोटे व्यावसायिक यांच्या वस्तू खरेदी करून त्यांच्या उदरनिर्वाहाला हातभार लावावा. समाजातील वंचित घटकांनाही सणाच्या आनंदात सहभागी करून घ्यावे. भेटवस्तूंपेक्षा प्रेमाचे दोन शब्द, महागड्या सजावटीपेक्षा घरातील माणसांचे हसू आणि संपत्तीच्या प्रदर्शनापेक्षा मनाचे मोठेपण अधिक महत्त्वाचे आहे, याची जाणीव ठेवावी.

नव्या वर्षाचा संकल्प : मन समृद्ध करूया, नाती जपूया!

बलिप्रतिपदा आणि दिवाळी पाडवा हे केवळ दिनदर्शिकेतील सण नाहीत, तर जीवन अधिक सुंदर करण्याची प्रेरणा देणारे दिवस आहेत. राजा बळीच्या त्यागातून उदारता, वामन अवताराच्या कथेतून नम्रता, तर पाडव्याच्या परंपरेतून प्रेम आणि परस्पर सन्मानाची शिकवण मिळते. आजच्या काळात या मूल्यांची गरज अधिक आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात एक तरी चांगले काम करण्याचा संकल्प केला, एखाद्या गरजूच्या जीवनात आनंद निर्माण केला आणि आपल्या माणसांशी असलेली नाती अधिक घट्ट केली, तर या सणाचे सार्थक होईल. घरातील दिव्यांचा प्रकाश काही तासांत मंदावेल; पण माणुसकीचा, प्रेमाचा आणि सद्भावनेचा दिवा वर्षभर तेवत राहिला पाहिजे. कारण खऱ्या अर्थाने समृद्धी ही केवळ धनसंपत्तीत नसते, ती असते निरोगी मनात, आनंदी कुटुंबात, समाधानी जीवनात आणि दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू फुलविण्याच्या वृत्तीत!

चला तर, या बलिप्रतिपदेला केवळ घर उजळवू नका, तर मनही उजळवा. नात्यांमध्ये आपुलकीचा सुगंध दरवळू द्या आणि समृद्धीचा अर्थ समाजकल्याणाशी जोडून दिवाळी पाडव्याचा आनंद द्विगुणित करा!


आली दिवाळी.. दिवाळी..

आली दिवाळी दिवाळी, उजळीत तेजाच्या राशी,
मंद तेवे दिवली.. तुळशीच्या वृंदावनापाशी.
पणत्याची आवली शोभे, सारवलेल्या अंगणात,
मनाचे उन्मलीत रंग प्रगटले रांगोळीत.
मनमुराद लहरे तो कंदील, झुलवीत तनु चंचल,
सजले अंगण, नटले सान, थोर, बाल.
लक्ष्मी वावरते नगरी, मग अलक्ष्मी का असे कुणा घरात,
तृप्तीचा असे प्रत्येक घास, गृहलक्ष्मी तृप्त असे दारात.
चिमणी पाखरे होती दंग फटाके, किल्ल्यात.
सुकली खोडे सारी साठवती सुख नयनात,म्हणती,
जरी आपल्यापरी असे दिवाळी आता मस्त.
लखलख उजळती ज्योती,परी अंतर असे नात्यात.
आम्ही दोघ ,आमचं एक,येव्हढंच यांचं विश्व.
आंटी, अंकल ही नाती मुलं शिकतात पुस्तकात,
आजी, आजोबा येती चार दिवस फक्त.
पैश्याच्या लखलाखाटात होते आता दिवाळी मस्त.
वेल्हाळ वेडे ते मन, डोकवते भूतकाळात.
त्या बोचाऱ्या थंडीत, चुलीवरच्या कडकडीत पाण्यात,
उघड्या अंगणातली ती कुडकूडणारी अंघोळ.
चुलत, आत्ते मामे भावांचा मग तो मिळून केलेला फ़राळ.
हशा, चेष्टेला येतसे उधाण.
रांगोळ्यानी सजे पंगत, आग्रह असे अमाप,
संध्याकाळ गाजे फटाक्यांनी न, जे असतील ते वाटले जात सर्वात.
पाडवा भाऊबीजेची रंगत असे न्यारी,
एक रुपया ओवळणी देखील वाटे खूप भारी.
आला, गेला सारे होती तृप्त.
परत पुढच्या दिवाळीची लागे खूप आस.
आता बदलले सारे की खरंच आपणच बदललो ?
संकुचित वृतीचा कोष स्वतःभोवती ल्यालो.
काय मिळाले यातून..एकटे आपणचं पडलो.
सगळे आहे.. परी समाधान गेले हरवून.
पुढील पिढीसाठी काय ठेवू आदर्श आपण.
विसरू नात्याच्या सीमारेषा, साद देऊ अंतरंगास..
माणूस आहोत आपण, चुकू शकतो हे ठेवू आपल्या ध्यानात खास.
जोडू आप्त बंध हे सारे..खुलवू ते हरवलेले रंग.
सजवू दिवाळी आपली..त्या रेशमी, नाजुक बंधनात.
दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा..

-मृणाल शामराज



धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील बँकेचे तमाम
सभासद, शेतकरी, व्यापारी बांधव व तमाम जनतेस
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
-: शुभेच्छूक :-




मा.राजवर्धनजी कदमबांडे
(अध्यक्ष)



मा.दीपकभाई पुरुषोत्तम पाटील
(उपाध्यक्ष)

व समस्त संचालक मंडळ
धुळे व नंदुरबार जिल्हा
मध्यवर्ती सह.बँक लि.धुळे

www.ckcorp.in
CK TIMES
www.ckcorp.in
५० वर्षांचा समृद्ध वारसा... गुणवत्तेची अखंड परंपरा!




SPACIOUS LIVING ROOM


MODERN KITCHEN


DEDICATED PARKING


LUXURIOUS BEDROOMS

ELEGANT FLOOR PLAN



EVERYTHING WITHIN REACH
SCHOOLS · HOSPITALS · SHOPPING · EASY CONECTIVITY
and daily needs - all just minutes away.

Spacious Bedroom · Living Room · Modern Bathroom · Modular Kitchen · Dining Space · Large Windows · Balcony · Water Supply · 3kw Solar System · Private Parking · Separate Borewell

Project by :
Chandrakant Kele Corp
OFFICE :
Dinesh Complex, Nehru Chowk,
Aagra Road, Deopur, Dhule
CONTACT :
7709 080808
7709 000493

स्वर्गीय सप्त सुरांची मांदियाळी

नितीन अहिरराव
मो.१०९६२०४८७५

नमस्कार मित्रांनो , मित्रांनो संगीताच्या जगातून एक एक करत मोहंमद रफी ,किशोर कुमार, मन्ना डे, मुकेश , लता मंगेशकर, आशा भोसले आणि सुमन कल्याणपुर ही रत्ने आपल्यातुन निघून गेली , यात प्रत्येक गायकाचे वैशिष्ट्य वेगळेच होते . मोहंमद रफी साहेबांचा आवाज भारदस्त आणि गोड होता , त्यांच्या आवाजात प्रेमगीत जसे गोड वाटायचे तसेच भजन सुध्दा गोड वाटायचे, नायकाचे गाणे असो , नायिकेचा वडिलांचा आवाज असो , एखाद्या कव्वालची कव्वाली असो किंवा लहान मुलांसाठी गायलेले एखादे बालगीत असो , गाण्याचा कोणताही प्रकार घ्या मोहंमद रफीचा आवाज एकदम परफेक्ट फिट होत असे , मोहंमद रफीचा आवाज मंदिरातील गाभाऱ्यात जसा घंटानाद खणखणतो तसाच स्पष्ट, गुढ आणि आध्यात्मिक वाटायचा , मोहंमद रफी जेव्हा तेरी प्यारी प्यारी सुरत को किसी की नजर ना लगे गायचे तेव्हा त्याच्या स्वरातून एक खरा प्रेमी आपल्या प्रेमिका किती जिवापाड प्रेम करतो याची जाणीव ऐकणाऱ्याला व्हायची . आणि तो मोहंमद रफी जेव्हा बाबुल की दुवाये लेती जा , जा तुजको सुखी संसार मिले गायचा तेव्हा एका बापाचे आर्त सुर ऐकणाऱ्याच्या डोळ्यातुन सहज पाणी आल्या वाचून राहत नसत . अशी मोहंमद रफीच्या स्वरात जादु होती.

किशोर कुमार तर एक अवलिया कलाकार होते , त्यांनी गाण्याचे कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नसतांना ते गाणे इतके अप्रतिम गायचे की त्याला आज ही तोड नाही , प्रचंड मेहनत करून नावारूपास आले , त्यांनी त्यांची खास शैली निर्माण केली ती याडलिंग नावाने ओळखली गेली , एखादा शास्त्रीय गायक जसा ताना , अलाप, घेवून गाणे सजवतो तसे किशोर कुमार हे याडलिंग गावुन आपले गाणे सजवायचे. आपला भारदस्त आवाज हवा तसा स्केल मधे फिरवण्याची ताकद किशोर कुमार यांच्यात होती . त्यांच्या आवाजाची साथ घेवून राजेश खन्ना , अमिताभ बच्चन, देवानंद, शशी कपूर, धर्मेंद्र, जितेंद्र असे अनेक कलाकार सुपरस्टार झाले आणि नावारूपास आले . किशोर कुमार आणि मन्ना डे यांची एक नावाजलेली



जुगलबंदी म्हणजे पडोसन या चित्रपटातील एक चतुर नार करके सिंगार हे गाणे . आज ही जुगलबंदी ऐकली की मन आणि कान दोघे ही तृप्त होतात , किशोर कुमार नेहमीच काही वेगळेपणा आपल्या गाण्यात आणत , त्यासाठी ते हवे ते करत असत आणि रसिकांना काहीतरी नवीन देण्याचा प्रयतक करत असत . डॉन चित्रपटातील खयीके पान बनारस वाला हे गाणे त्यांनी प्रत्यक्षात पान खाऊन गायले आहे, कसोटी चित्रपटातील हम बोलेगा तो बोलेगे के बोलता है हे गाणे नेपाळी टोन मधे गायले आहे ,हे गाणे ऐकतांना एक नेपाळी व्यक्तीच गाणे गातो आहे असा भास होतो .याराना चित्रपटातील छु कर मेरे मन को किया तुने क्या इशारा या गाण्यात किशोर कुमार यांचा सुर अगदीच अप्रतिम लागला होता .किशोर कुमार सारखा गायक एकदाच जन्माला येतो आणि अमर होवून जातो.

मन्ना डे हे अजून एक प्रख्यात नाव , यांचा आवाज अतिशय मधाळ होता , मन्ना डे यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतलेले असल्याने त्यांच्या नावावर असंख्य शास्त्रीय रागातील गाणे आहेत , जसे लागा चुनरीमे दाग छुपावु कैसे अज हु नआये बालमा सावन बिता जाये फुल गेंदवा ना मारो लगत करजवा मे अशी असंख्य गाणी त्यांनी गावुन अजरामर करून ठेवली आहेत. प्रसिद्ध शोमन राज कपूर यांच्यावर चित्रीत प्रेमगीते मन्ना डे यांनीच गायलेली आहेत. खर तर राजकपूर चा आवाज म्हणून मुकेश यांनाच ओळखले जाते पण जेव्हा जेव्हा राजकपूर पडद्यावर प्रेमगीत गात होते तेव्हा मन्ना डे च त्यांना आवाज देत होते . ऐ रात भिगी भिगी हे गाणे पडद्यावर पाहतांना एक वेगळाच आज ही प्रेक्षकांना मिळतो . बसंत बहार चित्रपटातील एक जुगलबंदी आहे त्यात मन्ना डे समोर विख्यात गायक पंडित भीमसेन जोशी होते , दोन महान गायकांची ही जुगलबंदी खूपच श्रवणीय झालेली आणि ते गाणे म्हणजे केतकी गुलाब जुही चंपक बन फुले हे होय मन्ना डे यांनी राजकपूर , मनोज कुमार, भारत भुषण, मेहमूद, प्राण अश्या असंख्य नायकांना आपला आवाज दिला आहे , त्यानी हिंदी बरोबरच मराठी , बंगाली , पंजाबी आणि इतर भाषेत सुध्दा अनेक गाणे गायली आहेत.

आशा भोसलेंचा आवाज म्हणजे एक खणखणीत नाणेच आहे , असा गाण्यातला कोणताच प्रकार राहिला नाही जो आशाताईनी गायला नाही , भावगीत, भक्तीगीत, कव्वाली , प्रेमगीत, कॅब्रे, डिस्को , लावणी ,विरहगीत, अंगाई, जे जे गाण्याचे प्रकार आहेत ते सर्व आशाताईनी गायले आहेत . त्या वेळचे सर्वच गायका जसे मुकेश, रफी , किशोर कुमार, हेमंत कुमार, मन्ना डे यांच्या सोबत आशाताईनी गाणे गायले आहेत, नवीन पिढीच्या गायकासोबत सुध्दा त्या तितक्याच ताकदीने गायल्या आहेत, कुमार सानु ,अमित कुमार, शब्बीर कुमार, मोहंमद अजीज, उदित नारायण, सोनु निगम, विनोद राठोड या गायकासोबत त्या गायल्या आहेत . आशाताईंचा आवाज म्हणजे एक आश्चर्यच म्हणावे लागेल त्या तोरा मन दर्पण कहेलाये ज्या तन्मयतेने गात ,त्याच तन्मयतेने निगाहे मिलाने को जी चाहता है आणि पल दो पल का साथ हमारा पल दो पल के याराने है या कव्वाली पण गात असत . सुन सुन सुन दिदी तेरे लिये एक रिश्ता आया है है रेखा वर चित्रीत झालेले गाणे पाहतांना आणि ऐकतांना एक अल्लडपणा स्वरात हवा होता तोच अल्लडपणा आशाताईनी आपल्या गाण्यात आणला आहे आणि आज हे गाणे पाहतांना दोन बहिणींचे प्रेम यात दिसुन येते . आशाताई आणि किशोर कुमार यांची युगलगीते म्हणजे रसिकांना स्वरांची मेजवानीच वाटते , पडद्यावर कोणी का नायक नायिका असेना आशाताई आणि किशोर कुमार यांचा आवाज असला म्हणजे ते गाणे सुपर डुपर हिट होईल यात कोणतीच शंका नसे . पाच सहा दशके स्वरांवर विराजमान होणे ही साधी गोष्ट नाही , त्यासाठी प्रचंड मेहनत, न थांबता केलेला रियाज आणि सातत्य या सर्व गोष्टी आशाताईनी केल्या म्हणूनच त्या गायन क्षेत्रातील एक विद्यापीठ म्हणून ओळखल्या जातात.

भारतरत्न, गानसम्राज्ञी, गान कोकीळा , साक्षात सरस्वतीचा अवतार अशी अनेक विशेषणे धारण करणारे नाव म्हणजे लता मंगेशकर लताबाईचा आवाज म्हणजे साक्षात सरस्वती देवीचा दैवी आवाज होता , लताबाईना गाण्याचा वारसा आपल्या वडिलांकडून म्हणजे मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या कडून मिळाला , लहानपणापासून गाण्याचे सुर लताबाईच्या कानावर पडत होते आणि लहान लता कळत नकळत ते आत्मसात करत होत्या . घरात नाट्यसंगीताचे वातावरण होते , मोठ मोठ्या गायकांचे गाणे त्यांच्या कानावर पडत होते आणि लताबाईवर गाण्याचे संस्कार होत होते , सुर कसे लावायचे, राग कसे गायचे , गातांना श्वास कुठे घ्यायचा . रोजचा रियाज कसा करायचा हे त्या लहानपणापासून शिकत होत्या , अनेक विख्यात गायकांचे गाणे (पान ५ वर)

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

मातृसेवा स्त्रीरोग व प्रसुती हॉस्पीटल



ॲडव्हान्सड् फर्टीलिटी क्लिनिक

अत्याधुनिक वंध्यत्व निवारण केंद्र

डॉ.सुनिल नाईक
एम.डी.

डॉ.सौ.सविता नाईक
एम.डी. (ॲनेस्थेशिया)

पत्ता : १७, श्रीरामनगर, जयहिंद सिनिअर कॉलेजजवळ, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे. फोन नं.(०२५६२) २२०३२९

धुळे जिल्ह्यातील
तमाम जनतेला
तसेच शेतकरी बांधवांना



शुभ दिपावली
निमित्त
हार्दिक शुभेच्छा



..... शुभेच्छुक .....

श्री. जितेंद्र भटू सोनवणे
इंजि. सुमित सुधाकर बोरसे
इंजि. अमित सुधाकर बोरसे
इंजि. संकेत दिलीप बोरसे
श्री. निशांत देविदास बोरसे



बोरसे ब्रदर्स, धुळे
श्री.देविदास रामभाऊ पाटील (देवाबापू)



रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळू दे ॥
लक्ष्मीच्या पावलांनी घर
सुख समृद्धीने भरु दे ॥



शुभ दिपावली
दिपावली व लक्ष्मीपुजन
निमित्त हार्दिक शुभेच्छा...



भारतीय जनता पार्टी शिरपूर
प्रशांत चौधरी
जिल्हाउपाध्यक्ष
भारतीय जनता युवा मोर्चा धुळे ग्रामिण

शारदा ट्रॅक्टर्स
सेल्स ॲण्ड सर्व्हीस



भरपूर मजबूतपणाची नवी स्टाईल हा आहे नवा स्वराज
9850546696/9970907911/9096237000/9850970744
मुख्य शाखा : आनंद सदनजवळ,शिरपूर फाटा, आमोदे ता.शिरपूर जि.धुळे
दोंडाईचा शोरूम : केशरानंद पेट्रोल पंपासमोर,दोंडाईचा ता.शिंदखेडा जि.धुळे

दिपावलीनिमित्त तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा!

किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर







मा.श्री.भाऊसो.
तुषार विश्वासराव रंधे
अध्यक्ष जि.प.धुळे
अध्यक्ष, किविप्र संस्था, शिरपूर



मा.श्री.नानासो.
निशांत विश्वासराव रंधे
सचिव, किविप्र संस्था, शिरपूर



श्रीमती आशाताई रंधे
कोषाध्यक्ष,
किविप्र संस्था, शिरपूर

विचारधन...

शालेय जीवन हे बहुविध व बहुश्रुत असावे, असे आपणास वाटत असल्यास व एक सधन नागरिक समाजाला द्यावा असे आपणास वाटत असेल, तर शिक्षणाने त्याच्या मूलभूत सवयीत फरक करता आला पाहिजे.
मुलांना काही शिकवायच्या अगोदर प्रथम आपणच ती गोष्ट करायला शिकले पाहिजे. शाळेच्या आवारात कमालीची शांतता असावी. स्वच्छता ही सक्तीची असू नये. कचरा टाकण्याच्या पेट्या असाव्यात. खरे तर कोणीही धूम्रपान करू नये, कोणी धूम्रपान करीतच असेल, तर त्यांची थोटके टोपलीतच टाकावीत. मुलांना कागदाचे कपटे कचरापेटीत टाकावयास सांगा. आपण टाका म्हणजे ते टाकतील. आपण एखादे झाड लावा किंवा लावलेल्या झाडांचे संगोपन करा. याचा त्यांच्या जीवनावर परिणाम होईल. आपण वृत्तपत्र वाचा व मुलांकडून वाचून घ्या. एक तास जादा शाळा चालवा या जादा तासात मुलांना व्यवहारज्ञानाचे धडे द्या. आपण करीत असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रयोगामध्ये वाढ करा. इतरांनी त्याचा पाठपुरावा करावा, असे ते प्रयोग असावेत. दरमहा काहीतरी देणगी व त्यासंबंधी वर्तमानपत्रात लिहा म्हणजे त्यातून इतरांना स्फूर्ती मिळेल. एक वेळच्या जेवणाचा पैसा वाचवून त्याने शिक्षणासाठी द्यावा, असा विचार त्यांना सांगावा. त्या पैशातून राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने त्यांनाच खाऊ वाटा...
(कै.) कर्मवीर व्यंकटराव अण्णा रणधीर

सन्माननीय कार्यकारी मंडळ.
डॉ तुषार विश्वासराव रंधे (अध्यक्ष)
मा. श्री निशांत विश्वासराव रंधे (सचिव)
मा.श्री राहुल विश्वासराव रंधे (विश्वस्त)
मा.सौ. सीमा तुषार रंधे (विश्वस्त)
मा.श्री शामकांत शिवाजी पाटील (विश्वस्त)
मा. श्री आनंदसिंग राऊळ (स्विकृत सदस्य)
मा.श्री डॉ.जितेन्द्र दयाराम चित्ते (स्विकृत सदस्य)
श्री के.डी.बच्छाव (व्यवस्थापक)
श्री सीताराम माळी (लेखापाल)
मा.श्रीमती आशाताई विजयराव रंधे (खजिनदार)
मा.श्री.रोहित विजयराव रंधे (विश्वस्त)
मा.सौ. हर्षाली रोहित रंधे (विश्वस्त)
मा. श्री संजय एस्.गुजर (विश्वस्त)
मा.श्री राजेंद्र जगदीश अग्रवाल (स्विकृत सदस्य)
श्री आनंदराव अमृतराव पाटील (व्यवस्थापक)
श्री भैय्या माळी (व्यवस्थापक)
श्री प्रमोद बोरसे (संगणक प्रमुख)

संस्थेचा शैक्षणिक विस्तार
• वरिष्ठ महाविद्यालय-३
• कनिष्ठ महाविद्यालय-१०
• व्यावसायिक विद्यालय/ महाविद्यालय-८
• माध्यमिक शाळा-२०
• प्राथमिक इंग्रजी माध्यम-१०
• माध्यमिक इंग्रजी माध्यम-१
• आश्रम शाळा- १
• वसतीगृहे अनुदानित-७
• संलग्न वसतीगृहे- ६
• संलग्न- ११

किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर जि. धुळे

रिकाम्या बाटल्या आणि स्वप्नांचा चुरा..!

संजय धनगर
ओझरमिग,मो.९६३७३२५१६०

आपला भारत देश आज जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातोय. महासत्तेच्या दिशेने आपण दिमाखात वाटचाल करत आहोत, पण या चकचकीत चित्राच्या मागे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि बेरोजगारीचे एक भयानक वास्तव दडलेले आहे. देशात बालकांपासून युवकांपर्यंतचा प्रवास पाहिला, तर आजही अनेक ठिकाणी विदारक दृश्ये डोळ्यांसमोर येतात. श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालला आहे आणि गरीब मात्र आजही दोन वेळच्या अन्नासाठी संघर्ष करत आहे. ही दरी कमी करण्यासाठी केवळ घोषणा नकोत, तर गावपातळीपासून देशपातळीपर्यंत प्रत्यक्ष कृतीची गरज आहे.

✻ भक्तीचा सोहळा की जगण्याचा संघर्ष? : काही दिवसांपूर्वी एका आध्यात्मिक स्थळी जाण्याचा योग आला. तिथे एका बाजूला मबोकड बळीफ देऊन नवस फेडण्याचा भक्तीचा सोहळा सुरू होता, तर दुसरीकडे जगण्यासाठीचा एक अस्वस्थ करणारा संघर्ष दिसत होता. देवीच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला होता, पण त्याच गजबजाटात एका कोपऱ्यात समाजाचे एक विद्रूप रुप शांतपणे पाय पसरून बसले होते. झाडाझुडपात आणि उन्हाच्या आडोशाला बसून मद्यपान करणाऱ्यांची संख्या मोठी होती. तिथेच एक - वर्षांचा मुलगा मद्यपीनी मद्यपान करून फेकून दिलेल्या रिकाम्या बाटल्या उत्साहाने गोळा करत होता. त्या बाटल्या त्या मुलासाठी मकचराफनव्हत्या, तर ती त्याच्या पोटाची मखळगीफ भरण्याचे साधन होत्या. कुतूहलाने मी त्याला विचारलं, बाळा, या रिकाम्या बाटल्यांचं तू काय करतोस? त्याने दिलेलं उत्तर काळजाला स्पर्श करून गेलं. तो म्हणाला, मी एक बाटली एक रुपयाला विकतो. दिवसातून - बाटल्या जमा झाल्या; की त्यातून स्वतःसाठी खायला घेतो आणि उरलेले पैसे घरी नेऊन देतो. अध्यात्माच्या महाकुंभात जिथे लोक मुक्ती शोधायला येतात, तिथे एक बालक जगण्यासाठी बाटल्या शोधत होता, हे आपल्या व्यवस्थेचे मोठे अपयश आहे.

स ु शि क्ष ि त ां च ी मअस्वच्छफ मानसिकता : आपण स्वतःला उच्चभ्रू आणि सुशिक्षित म्हणवून घेतो. स्वतः च्या चैनीसाठी किंवा व्यसनासाठी मद्यपान करणारे समाजात अनेक आहेत. सार्वजनिक ठिकाणी कचरा करताना किंवा बाटल्या फेकून देताना आईवडिलांकडून मिळालेले संस्कार आणि घेतलेले आपले उच्च शिक्षण कुठे जाते? धार्मिक आध्यात्मिक ठिकाणी मद्यपान करणे ही मानवाची नैतिक घसरण आहेच; पण त्या बाटल्या बेजबाबदारपणे तिथेच टाकून देणे हा कृतघ्नपणा आहे. आपण रिकामे ग्लास आणि बाटल्यांचा खच तेथेच टाकून निघून जातो, पण तिथूनच या मुलांच्या संघर्षाची सुरुवात होते. ज्यांना समाज मभंगारवालेफ म्हणून हिणवतो, तेच खरे तर समाजाचे मअदृश्य स्वच्छतादूतफ आहेत. टाकाऊतून टिकाऊ शोधणारी बाल्यावस्था प्रवासात किंवा हॉटेलात आपण पाण्याची बाटली विकत घेतो आणि रिकामी झाली; की अगदी सहज कुठलीही अपराधीपणाची भावना मनात न येऊ देता सार्वजनिक ठिकाणी फेकून देतो; पण या मुलांच्या दृष्टीने ती केवळ बाटली नसते, तर पुढच्या जेवणाची सोय असते. उन्हातान्हात अनवाणी पायाने फिरत ही मुले टाकाऊ वस्तूंमध्ये



स्वतःचे अस्तित्व शोधण्याचा प्रयतक करत असतात. ज्या वयात हातामध्ये पाटी-पेन्सिल असायला हवी, त्या वयात ही मुले दारूच्या बाटल्या गोळा करत आहेत, हे पाहून मन सुन्न होते. या कामात त्यांच्या आरोग्यालाही मोठा धोका असतो. कचऱ्यातील सुया, फुटलेल्या काचा आणि घाणीमुळे त्यांना त्वचेचे गंभीर आजार किंवा जखमा होतात. तरीही ते दुर्लक्ष करतात, कारण पोटाची भूक या जखमांपेक्षा मोठी असते.

✻ पर्यावरणाचे अदृश्य रक्षक : कदाचित हे पटणार नाही, पण कचरा वेचणारी ही मुले, स्त्रिया पर्यावरणाचे रक्षणच करत असतात. ते एक प्रकारे समाजाचे मस्वच्छतादूतफ असतात. शहरातून निघणारा प्लास्टिक कचरा आणि काचेच्या बाटल्या गोळा करून त्या पुनर्प्रक्रियेसाठी () पाठवण्यात यांचा मोठा वाटा आहे. ही मुले आणि महिला नसत्या, तर आपले नद्या-नाले आणि रस्ते प्लास्टिकने कधीच तुंबले असते. यासंबंधी आपली जबाबदारी काय? तर केवळ हळहळ व्यक्त करून हा प्रश्न सुटणार नाहीत. आपण आपल्या परीने काही पावले उचलू शकतो:

✻ कचऱ्याचे वर्गीकरण: घरापासून ते सार्वजनिक ठिकाणांपर्यंत ओला आणि सुका कचरा वेगळा ठेवावा. धारदार वस्तू किंवा फुटलेल्या काचा वेगळ्या डब्यात ठेवाव्यात, जेणेकरून या मुलांना इजा होणार नाही.

✻ शिक्षणाशी जोडणी : आपल्या परिसरात अशी मुले दिसली, तर त्यांना सरकारी शाळेत दाखल करण्यासाठी प्रयतक करावेत. ज्या दिवशी या मुलांच्या हातातील मळलेली गोणी जाऊन तिथे पुस्तके येतील, त्याच दिवशी खऱ्या अर्थाने समाजाची प्रगती झाली असे म्हणता येईल. रस्त्याच्या कडेला पडलेल्या कचऱ्याचा ढीग पाहून आपण नाक मुरडतो, पण हातात मळलेली गोणी आणि डोळ्यात आकाशाएवढी स्वप्नं घेऊन जेव्हा तो मुलगा रिकामी बाटली गोणीत टाकतो, तेव्हा त्या बाटलीच्या आवाजासोबतच त्याच्या बालपणीच्या स्वप्नांचाही चुरा होत असतो. दारिद्र्य ही केवळ आर्थिक स्थिती नाही, तर ती मानवी हक्कांची पायमल्ही आहे. सरकारी योजना आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने या समस्येवर मात करता येईल, पण मआर्थिक सक्षमीकरणफ हाच यावर कायमस्वरूपी उपाय आहे. ... आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्वतःला उच्चभ्रू, सुशिक्षित समजणाऱ्या आणि एकंदरच सर्व समाजाने स्वतःसाठी स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लावून घेतल्या पाहिजे आणि स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासनाला सहकार्य केले पाहिजे. आपण स्थानिक प्रशासनाला विविध रुपाने कर भरतो, म्हणजे आपल्याला कुठेही कचरा टाकण्याचा आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता निर्माण करण्याचा परवाना मिळाला असे समजू नये. शहराचा एक सुजाण नागरिक म्हणून आपली जी प्राथमिक कर्तव्य आहेत, ती अधिकाधिक जबाबदारीने पार पाडली पाहिजे; तरच मआपला देश, स्वच्छ देश!फ ही संकल्पना प्रत्यक्षात उतरू शकेल; कारण महक्क आणि कर्तव्य हे एकमेकांच्या हातात हात घालून चालले तर हे शक्य होईल!

हास्य कॉर्नर : प्रशांत आष्टीकर









स्वर्गीय सप्त सुरांची मांदियाळी

(पान ४ वरुन) ऐकून त्यांचा कान तयार झाला होता , कोण कसे गातो , विशिष्ट आलाप आणी ताना कोण कसे घेतो हे त्या सर्व पाहत होत्या आणि त्याचा रियाज पण करत होत्या . वडिलांचे निधन झाल्यावर सर्व जबाबदारी लहानग्या लता वर पडली आणि त्यांनी गाणे गायचे सुरू केले . गायन क्षेत्रात पुढे येण्यासाठी त्यांचा संघर्ष सुरू झाला, अनेक अडथळे , अडचणी त्यांना आल्या पण याच संघर्षात त्या सोन्या सारख्या तावुन सुखावून निघाल्या .सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा आवाज पातळ आहे असे म्हणून नाकारला गेला होता पण लताबाईंनी हार न मानता आपला संघर्ष चालु ठेवला आणि त्यांच्या प्रयतकांना यश आले , लताबाईचा हाच पातळ आवाज लोकांना आवडायला लागला . मदन मोहन , नौशाद, शंकर जय किशन , लक्ष्मीकांत प्यारेलाल , आणि इतर नावाजलेल्या संगीतकारांनी लताबाईचा सुमधूर आवाज वापरून हजारो गीते आपल्याला दिली आहेत. लताबाईचे गाणे ऐकले नाही असा एक ही माणूस या पृथ्वीवर नाही ,असा त्यांचा आवाज होता , आज लताबाई आपल्या नाही पण त्या आवाजाच्या आणि गाण्याच्या माध्यमतुन अमर झालेल्या आहेत. त्यानी प्रत्येक गाणे पहिल्यांदा समजून घेतले, त्या गाण्यात काय भावना लिहिल्या आहेत हे समजून घेतले , त्या गाण्याला संगीतकारने कसे संगीत दिले आहे , संगीतकाराची अपेक्षित काय आहे याचा सर्व अभ्यास करून, गाण्याचा रियाज करून त्या रेकॉर्डिंग साठी माईक समोर उभ्या राहत होत्या .त्यांनी जे तेव्हा कष्ट घेतले आणि गाणे रेकॉर्डिंग केले ते गाणे आज ही नवीन पिढीतील रसिकांना आवडते कारण ते गाणे गाणे नसून एक एक मास्टर पीस तयार झाले आहेत जे पुढील अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत. लताजींनी जुन्या काळातील मधुबाला , नुतन , नर्गीस, वहिदा रेहमान, आशा पारेख, मुमताज, माला सिन्हा आणि इतर नायिकांना आपला आवाज दिला , त्यानंतर आलेल्या रेखा , राखी , मौसमी, श्रीदेवी, जया प्रदा, आणि त्यानंतर आलेल्या भाग्यश्री , माधुरी, जुही चावला, काजोल, तब्बु अश्या अनेक गायिकांना आपला आवाज दिला आहे .

स्वर्गीय गायक मुकेश यांनी एखादे गाणे गायले आणि ते गाणे सुपरहिट झाले नाही असे कधीच झालेच नाही , मुकेश यांचे प्रत्येक गाणे हिटच झालेले आहे , मुकेश यांच्या आवाजात एक दर्द होता आणि तोच दर्द रसिकांच्या काळजात थेट घुसायचा आणि तो आवाज प्रत्येकाला आपलाच वाटायचा . मेरी मन की गंगा और तेरे मन की जमुना का बोल राधा बोल संगम होगा के नही हे गाणे असो की सजन रे झुठ मत बोलो खुदा के पास जाना है हे गाणे असो मुकेश ते गाणे गाऊन आपलेसे करतो आणि आपल्याला प्रेमाच्या सागरात न्हावु घालून तो लगेच चिंतन करायला भाग देखील पाडतो . राजकपूर आणि मुकेश हे एकमेकांचे जीव की प्राण झाले होते , इतके ते स्वराच्या माध्यमतुन एकजीव झाले होते . जिवनाचा सार किंवा काही आध्यात्मिक ज्ञान गाण्याच्या माध्यमतुन लोकांना सांगायचे असल्यास हमखास मुकेश यांचा आवाज संगीतकार वापरायचे एक दिन मीट जायेगा माटी मोल असो किंवा चल अकेला चल अकेला चल अकेला, तेरा मेला पिछे छुटा राही चल अकेला हे गाणे असो ,ही गाणी रसिकांना ऐकून कान तृप्त झाल्यासारखे वाटायचे . पडद्यावर नायकाचा हृदयभंग झाल्यावर तो नायक जेव्हा आपल्याला किती दुखं झालेले आहे हे दाखवण्यासाठी मुकेश यांच्या आवाजाच सहारा घ्यायचा. दोस्त दोस्त ना रहा प्यार प्यार ना रहा जिंदगी हमे तेरा ऐतबार ना रहा जब कोई तुम्हारा हृदय तोड दे ,तडपता हुवा तुम्हे छोड दे , तब तुम मेरे पास आना प्रिये हे गाणे ऐकून डोळे कधी पाणवतात हे आपल्याला कळत नाही . तोच मुकेश जेव्हा डम डम डिंगा डिंगा मौसम भिगा भिगा बिन पिये मै तो गिरा गातो तेव्हा आपल्याला देखील पावसात नाचावेसे वाटते . हिच मुकेश यांच्या आवाजातील जादु आहे मित्रांनो .

नुकत्याच वार्धक्यमुळे निधन पावलेल्या गायिका सुमन कल्याणपुर यांच्याबद्दल सांगायचे म्हणजे या एक शापित स्वर अप्सराच होत्या , त्यांच्या स्वरात कमालीचे माधुर्य ,कोमलता ,नजाकत होती . लता मंगेशकर आणि सुमन कल्याणपुर यांच्या आवाज ९९:९९% साम्य होते , आणि जो १% फरक होता तो म्हणजे लताबाईचे अलाप हाच काय तो फरक होता दोघांमधे, दोघांचे स्वर इतके सारखे होते की जेव्हा निवेदन सांगायचे की आता आपण जे गाणे ऐकले ते सुमन कल्याणपुर यांनी गायले होते , तो पर्यंत ऐकण्या-याला तो आवाज लता मंगेशकर यांचाच वाटे . आपल्याकडे जर लता मंगेशकर यांचे गाण्याच्या सिडी किंवा कॅसेट असतील तर त्या अल्बम मधे ६०% गाणी सुमन कल्याणपुर यांचीच सापडतील याची मी गॅरंटी देतो इतके साम्य दोघा गायिकेच्या आवाज होते . लता मंगेशकर यांच्या निधनानंतर त्याना श्रध्दांजली देण्याचा कार्यक्रम चैनईत पार पडला , त्यात भारतातील प्रसिद्ध गायकांनी एक गाणे सर्व मिळून गायले आणि त्या गाण्याचे बोल होते रहे ना रहे हम मेहका करेंगे बनके सबा बनके कली बागे वफा मे आणि आश्चर्य काय तर हे गाणे स्वर्गीय सुमन कल्याणपुर यांनीच गायलेले होते. लता मंगेशकर, आशा भोसले , यांच्या काळात सुमन कल्याणपुर यांना ज्या काही गायनाची संधी मिळाली त्या संधीचे अक्षरश त्यांनी सोने केले आणि आपण कुठेच कमी नाहीत हे संगीत विश्वाला दाखवून दिले .अनुकूल परिस्थितीत त्या प्रवाहाच्या विरुद्ध पोहत गेल्या आणि आपले नाणे खणखणीत वाजवत राहिल्या. सुमन कल्याणपुर यांच्यात कमालीचा संयम होता , मनात कोणतीच इर्षा, द्वेषा भावना नव्हती कारण त्यांना स्वतावर आणि आपल्या स्वरांवर विश्वास होता , त्यांनी गायलेली गाणी लताबाईच्या नावाने ऐकली जातात हे त्यांना माहीत होते पण त्यांची कधी कुठेच याची वाच्यता केली नाही किंवा कुठे कंप्लेंट केली नाही , त्या गात राहिल्या आणि आपले काम करत राहिल्या. लताबाई आणि सुमन कल्याणपुर या दोघीही महान गायिका आहेत पण लताबाईची गाणे उचलायची आणि आलाप घेण्याचे सामर्थ्य खूप मोठे होते उदाहरण द्यायचे झाल्यास संगम चित्रपटातील ओ मेरे ओ मेरे समन गाण्याचा आधीचा अलाप ऐकून अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही , मेरे नैना सावन भादो चा आर्त स्वर फक्त लताबाईच गाऊ शकतात. हिना चित्रपटातील मै हु खुश रंग हिना या गाण्याच्या आधी जो आलाप लतांजींनी गायला तो निव्वळ अप्रतिमच आहे , एखाद्या हिरव्यागार खोल दरीत किंवा मंदिराच्या गाभाऱ्यात जसा आवाज घुमतो जसाच आवाज लताबाईचा घुमतो . आणि याच खास वैशिष्ट्यमुळे लताजी उजव्या ठरतात. एकाच शब्दात सांगायचे तर सुमन कल्याणपुर खालचा सा होत्या तर लताजी वरचा सा होत्या .

मित्रांनो भारतात आणि त्यातल्यात्यात महाराष्ट्रात संगीत नाटकांची परंपरा खुप जुनी आणि मोठी आहे , बालगंधर्व, मास्टर दीनानाथ मंगेशकर, पंडित जितेंद्र अभिषेकी, शोभाताई गुट्टु, गंगुबाई हनगल, वसंतराव देशपांडे असे अनेक गायक संगीत नाटकात गायचे. सिनेमा बोलता झाल्यावर कुंदनलाल सहगल नुरजॅहा, शमशाद बेगम, बेगम अख्तर ,गीता दत्त आणि इतर गायक गायला लागले. त्यानंतर लता, रफी , मुकेश, किशोर कुमार, आशाताई यांचे सुवर्ण युग झाले . आजपर्यंत लाखो गाणे लिहिले गेले आणि ते गायले गेले , आणि आज ही परंपरा अखंडपणे चालुच आहे आणि जो पर्यंत पृथ्वीवर मानवाचे अस्तित्व आहे तो पर्यंत गाणे कधीच थांबणार नाही . लताबाई आशाताई मुकेश किशोर कुमार, रफी साहेब, मन्ना डे आणि सुमन कल्याणपुर यांच्या गाण्यावर एक एक स्वतंत्र पुस्तक लिहिले जाईल असे त्याचे महान कार्य आहे . पण मी थोडक्यात ते सांगण्याचा प्रयतक केला आहे . चला मित्रांनो आज इथेच थांबु या नमस्कार..!

देवा कशी करू दिवाळी

घरात नाही सध्या दाणा पाणी
देवा हात जोडतो तुला यावेळी
एकटाच घरात आहे याक्षणी
सांगना देवा कशी करू दिवाळी
फाटक्या संसाराला हातभार
लावायला नाही उरले अशा वेळी



देवा विनवणी करतो मी तुला
सांगना देवा कशी करू दिवाळी
माझं जे होतं तेही गेलं सारं
मागे काहीच नाही उरलं सुरलं
आमच्या नशिबात हीच का ती
सांगना देवा कशी करू दिवाळी
आनंदात गेली नाही ही दिवाळी
कोणाजवळ मांडावी गाऱ्हाणी
देवा तुच आहेस आमचा वाली
सांगना देवा कशी करू दिवाळी

-दिलीप हिरामण पाटील
कापडणे ता.जि.धुळे
मो.९७७३३८९८७३

तमाम शेतकरी बांधव, व्यापारी बांधवांना व तमाम धुळेकर वासियांना दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!



-: शुभेच्छूक :-

राजश्री ट्रेडर्स
अजय ट्रेडर्स

मका, ज्वारी, बाजरी, गहू आणि
कॅटलफिडीचे व्यापारी


जनरल मर्चंट ॲण्ड कमिशन एजंट

पत्ता : दु.नं.२२,क़ॉटन मार्केट, पारोळा रोड, धुळे

विजय चिंचोले
संचालक, कृउबा समिती, धुळे
मो.९४२२७९८३९७

अजय चिंचोले
मो.९४२२७८९३९७





हास्य कॉर्नर
: प्रशांत आष्टीकर







जाहीर नोटीस

तमाम जनतसे, संबंधीतांना, नातेवाईक आपतेष्टांना, वित्तीय संस्था, बॅका, पतसंस्थांना, सावकार, खाजगी सावकार व ओळखी व अनोळखी इसम इत्यादी सर्वाना सदर जाहिर पेपर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार नामे जमील अहमद शेख रसुल, वयः ५६, धंदाः मजुरी (पेंटर), रा.: गली, नं. १०, ख्वाजा च्या छडी जवळ, जुने धुळे, ता. जि. धुळे, ता. जि. धुळे यांना पत्नी आणि दोन मुले व दोन मुली असुन दोन्ही मुलींचे लग्न झालेले असुन मोठा मुलगा नामे मोहम्मद खालीद जमील अहमद हा आमच्या अशिलांच्या सोबतच राहत असुन लहान मुलगा नामे मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख, हा सुशिक्षित असुन दोन वर्षापासुन वेगळा राहत आहे. आमच्या अशिलांच्या लहान मुलगा नामे मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याचा व आमच्या अशिलांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा (दोन्ही मुली व जावई, भाऊ व इतर सर्व जवळचे नातेवाईक) यांचा काही एक वैयक्तिक प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष असा संबंध नाही.

मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याच्यावर आमच्या अशिलांचा आणि त्यांचे कुटुंबिय (दोन्ही मुली व जावई, भाऊ व इतर सर्व जवळचे नातेवाईक) यांचा कुठलाही ताबा राहिलेला नसून त्याचे आर्थिक व्यवहार पूर्णपणे वेगळे आहेत, तसेच तो आमच्या अशिलांच्या आणि त्यांच्या कुटुंबिय (दोन्ही मुली व जावई, भाऊ व इतर सर्व जवळचे नातेवाईक) यांच्यापासून विभक्त राहतो. तसेच मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याचे कोणत्याही भानगडीशी, कर्ज, हातउसनवार पैसे आणि आर्थिक व्यवहाराशी आमचे अशिल व त्यांचे नातेवाईकांचा संबंध नाही मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याने केलेला कोणताही वाद, कर्ज, हातउसनवार पैसे, भानगडी व आर्थिक व्यवहाराला आमचे अशिल व त्यांचे कुटुंबिय जबाबदार नाहीत.

मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याच्यावर आमच्या अशिलांचा व त्यांचे नातेवाईकांचा कुठलाही ताबा राहिलेला नसल्याने त्याचे कोणतेही वाद विवाद, पोलीस स्टेशन केसेस, कोर्ट कचेरी, आर्थिक व्यवहार, देणे घेणे, खाजगी व्यक्तीकडून कर्ज व इतर देवाण घेवाण यास मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख हा स्वतः वैयक्तिक व संबंधित व्यक्ती जबाबदार राहतील. आमचे अशिल अथवा आमचे अशिलांची पत्नी, मोठा मुलगा, दोन्ही मुली व जावई, भाऊ व इतर सर्व जवळचे नातेवाईक त्याला कुठल्याही प्रकारे साथ, मदत अथवा ते करत असलेल्या कृत्यास प्रोत्साहन देत नसल्याने आमचे अशिलांचे, त्यांची पत्नी, त्यांचा मोठा मुलगा, त्यांचे दोन्ही मुली व जावई, भाऊ व इतर सर्व जवळचे नातेवाईकांचा त्याने केलेल्या सर्व व्यवहाराशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध नाही.

आमचे अशिलांनी त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीमधुन मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याला बेदखल केलेले असुन त्याने केलेल्या कोणत्याही कृत्यास, व्यवहारास, कर्जास, खाजगी कर्जास, सावकारीने घेतलेल्या पैश्यास आमच्या अशिलांचा संबंध नसल्याने आमचे अशिल व त्यांचे इतर सर्व कुटुंबिय व नातेवाईक मुळीच जबाबदार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी. याउपरही जर कोणी आमच्या अशिलांच्या लहान मुलगा नामे मोहम्मद तोहीद जमील अहमद शेख याच्यासोबत कोणतेही आर्थिक व्यवहार, देवाण-घेवाण, कर्ज, पैसे केल्यास ते व्यवहार करणारे स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दी दिली असे. धुळे,दिनांकः- ०९/११/२०२६

ॲड. अशपाक एफ.शेख

कार्यालय ०५,पहिला मजला,अन्सार मस्जिद कॉम्प्लेक्स, तिरंगा चौक,८० फुटी रोड,धुळे. पिन ४२४००१, मो.९८२३०७८७६२

* धुळे, दि.१०- यंदाच्या दिवाळीवर महागाईचे सावट असल्याने त्याचा सर्वसामान्यांच्या आनंदावर परिणाम झाला आहे. दिवाळीच्या काळात शोभेच्याच नव्हे तर जीवनावश्यक आणि फराळाच्या वस्तु महागल्या आहेत.

टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकिय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरीफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः- तु.जि.धुळे पो. तु. व ता. धुळे पैकी मौजे धुळे येथील महानगर पालीका हद्दीतील स नं.८८/२/अ पैकी प्लॉट नं.१५ चे एकूण क्षेत्र १८६.०० चौ.मी. यास विस्तारित सि.स.नं.५८९२ चे एकूण क्षेत्र १९०.०० चौ.मी. सत्ताप्रकार क वरुळ प्लॉट.

यांसी प्लॉटची मापे व चतुःसिमा येणेप्रमाणे..

पुर्वेस	:	१५.५० मी.	६ मी.रस्ता
पश्चिमेस	:	१५.५० मी.	प्लॉट नं.१६
दक्षिणेस	:	१२.०० मी.	९ मी.रस्ता
उत्तरेस	:	१२.०० मी.	प्लॉट नं.१४

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक **नाना धोंडू राजपुत व हरसिंग धोंडू राजपुत रा.संभाप्पा कॉलनी, चितोड रोड,धुळे** यांचेशी सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरीफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह & लायसन्स, भाडेपट्टा, वारसहक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षणय, जप्ती, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापसून ७ दिवसांच्या आत खालील नमुद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची टायटल व्हेरीफिकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे. दि.०८/११/२०२६

ॲड. मंगेश बी. सोनवणे

ऑफिस-एस-२,गुरूप्रसाद संकुल जमनागीरी रोड,धुळे.मो.७५८८१२७४७७,९४०४७३६७९६

जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यता येते की, मिळकतीचे वर्णन :- मौजे धुळे ता.जि. धुळे मौजे. महिंदळे ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील सर्वे नं.८८/२/A/१ पैकी प्लॉट नं. २२ क्षेत्र १५० चौ.मी. (१६१४ चौ. फुट) लगडे नगर, महिंदळे शिवार येथील स्लॅब, लोडबेरींगचे बांधीव घर त्यात ४ रूम संडास, बाथरूम, इलेक्ट्रीक व नळ फिटींगसह व उर्वरीत बखळ प्लॉट २३ वर्ष जुने बांधकाम सदर मिळकत लिहुन देणार यांच्या ताब्यातील व मालकी उपभोगातील यांसी चतुःसिमा

पुर्वेस - वापर रस्ता, **पश्चिमेस**- प्लॉट नं.१५
दक्षिणेस- प्लॉट नं.२१, **उत्तरेस**- प्लॉट नं.२३

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी १) जय संजय नेतकर २) भारती संजय नेतकर, ३) राहुल संजय नेतकर रा. तिन्ही रा.श्रीराम नगर, शासकीय दुधडेअरी मागे धुळे, ता.जि.धुळे, ह.मु. फ्लॅट नं. १, सिध्दीविनायक अपार्टमेंट, राजेंद्र नगर, साक्रीरोड, ता.जि.धुळे यांच्याशी आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीचा सौदा करारनामा केलेला आहे व तशी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदा, करार, बक्षीस, गहाण, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार पत्र, मृत्युपत्र,बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत,तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस आमचे अशिलांने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे. दिनांक-०९/११/२०२६

ॲड. नंदराज एस. पाटील (नोटरी, भारत सरकार)
गांधी नगर, पारोळा रोड, धुळे मो.९८२३०९४८०५,८०८७५८२६०५

* धुळे, दि.१०- शहरातील फटाका विक्रेत्यांना वर्षानुवर्षांचा जेल रोड यंदा उपलब्ध झाला नाही. त्याम ुळे फटाका विक्रेत्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. यंदा दिवाळीनिमि त्त शहराची तात्पुरती फटाका बाज-ारपेठ कोठे असेल ? याबाबत नागरीक संभ्रमावस्थेत राहिले. त्याचा परिणाम उलाढालीवर झाला.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे वलवाडी, ता. जि. धुळे येथिल सर्व्हे नं.१५/१ पैकी प्लॉट नं. ४० चे क्षेत्र १५० चौ.मी.** यांसी चतुःसिमा पुर्वेस : प्लॉट नं.४१, पश्चिमेस : प्लॉट नं.३९, दक्षिणेस : ओपन स्पेस, उत्तरेस : ६ मिटर रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **श्री. संजय पांडुरंग सोनार,** रा.अहिल्यादेवी नगर, स्टेशन रोड, धुळे यांचे मालकीची असुन त्यांनी वर नमुद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार, पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे / घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे.दिनांक.०९/११/२०२६

ॲड. विजय म. मोरे

नोटरी-भारत सरकार,रा.बी/१२,भन्साली प्लाझा,नगरपटटी,धुळे.९८२२८५२६५०

NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **AKHTARBANO SHABBIRALI** TO **AKHTAR BANO SHABBIR ALI SAYYAD**

ADD- GHAR NO.440, GALLI NO.3, NEAR BAVLI, LALA SARDAR NAGAR, DEOPUR, DHULE-424002.

NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **SHABANABI MOHAMMAD ISMAIL PUTLIKAR** TO **SHABANA BI MOHAMMAD ISMAIL ATTAR**

ADD- PLOT NO.19, RAHMAT PARK, NATIONAL HIGH SCHOOL KE PASS, CHALISGAON ROAD, DHULE-424001.

NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM **PARVEEN BANO SHAIKH SALEEM** TO **PARVEEN SHAKIL SHAIKH**

ADD- GULAB HAJI NAGAR, VITABHATTI, DEOPUR, DHULE-424002.

NAME CHANGE

MY OLD NAME WAS
आफरीन बी बिंते शेख शकील
MY NEW NAME IS
आफरीन बी रफियोद्दीन खाटीक

ADD- RANA PRATAP NAGAR, SHAHID ABDUL HAMID NAGAR, DHULE.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **तु. जि. धुळे पो. तु. ता. जि. मिळकतीचे वर्णन :- मौजे महिंदळे शिवारातील ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.६२/२, क्षेत्र १ हे. .०५ आर, पो.ख. ० हे. .०७ आर, एकुण क्षेत्र १ हे. १२ आर, आकार २.३१ पैसे त्यापैकी पूर्वे वाजूकडील दक्षिणोत्तर लांबी क्षेत्र ००.३५ पो.ख. ००.३ आर एकूण क्षेत्र ००.३८ आर आकार २.५२ पैसे त्यांसी चतु:सिमा**

पुर्वेस :- सर्व्हे नं.५८ **पश्चिमेस**:- सर्व्हे नं.६२/२ यापैकीच उर्वरीत क्षेत्र
दक्षिणेस :- सर्व्हे नं.६०/६१ **उत्तरेस**:- साक्री रोड

येणेप्रमाणे वर नमुद वर्णनाची मिळकतीचे हल्ली मालक व कब्जेदार मयत कै. वामन नागो चौधरी यांचे वारस १) **श्री. लालचंद वामन चौधरी,** २) **सौ. वैशाली लालचंद चौधरी,** ३) **श्री. अमोल लालचंद चौधरी** ४) **सौ. तेजस्विनी अमोल चौधरी सर्व रा.मु.पो. कुसुंबा, ता.जि.धुळे** यांच्याशी आमचे अशिल यांनी वर नमुद मिळकतीचा (शेतजमीन) विकसन करारनामा केलेला आहे. तसेच बयाणा रक्कम देखील दिलेली आहे.

तसेच सदर मिळकतीवर बँक ऑफ महाराष्ट्र, मुख्य शाखा, धुळे यांचे कर्ज असून या व्यतिरिक्त सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदा, करार, बक्षीस, गहाण, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार पत्र, मृत्युपत्र,बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस आमचे अशिलांने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.१०- ०९/११/२०२६

ॲड. नंदराज एस. पाटील (नोटरी, भारत सरकार)
गांधी नगर, पारोळा रोड, धुळे मो.९८२३०९४८०५,८०८७५८२६०५

जाहीर नोटीस

तमाम जनतसे सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **तु. जि. धुळे पो. तु. ता. जि. मिळकतीचे वर्णन :- मौजे धुळे ता.जि.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. ४८७/२क पैकी ०-०८-२० यासी विस्तारीत सिटीएस नं. ९४०८/अ क्षेत्र ८४० चौ.मी. त्यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ५७३.७५ चौ.मी. बखळ प्लॉट त्यांसी चतु:सिमा**

पुर्वेस :- ९ मीटर रस्ता **पश्चिमेस** :- सर्व्हे नं.४९४
दक्षिणेस :- रस्ता **उत्तरेस** :- याच जागेपैकीच उर्वरीत क्षेत्र

येणेप्रमाणे वर नमुद वर्णनाची मिळकतीचे हल्ली मालक व कब्जेदार १) **श्री. घनश्याम लखुलालजी सोनी,** २) **सौ. उमाबाई घनश्याम सोनी,** ३) **श्री. संदिप घनश्याम सोनी** ४) **श्री. गिरीष घनश्याम सोनी सर्व रा.घर नं. १७११, तारगल्ली, सराफ बाजार धुळे, ता.जि.धुळे** यांच्याशी आमचे अशिल यांनी वर नमुद मिळकतीचा विकसन करारनामा केलेला आहे. तसेच बयाणा रक्कम देखील दिलेली आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदा, करार, बक्षीस, गहाण, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार पत्र, मृत्युपत्र,बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा पुढील व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आमचे अशिलांने दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे,दिनांक - ०९/११/२०२६

ॲड. नंदराज एस. पाटील (नोटरी, भारत सरकार)
गांधी नगर, पारोळा रोड, धुळे मो.९८२३०९४८०५,८०८७५८२६०५

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

DECLARATION

Here-by I Declare that my
Old name : VAIBHAV RAJENDRA CHAVAN
Has been changed to
New Name : VAIBHAV RAJENDRA THAKUR
Onwards all Oficial must be done by my New Name only

ADD- MAHADEV MANDIR CHAUK, MU.POST. BETAWAD, DIST- DHULE. (MS) 425403

एकाच छता खाली दिवाळी अंक

एकाच छताखाली राज्यातील नामवंत दिवाळी अंक अल्प खर्चात उपलब्ध. धुळे जिल्ह्यातील १७२ वर्षाची परंपरा असणाऱ्या धोंडो शामराव गरुड जिल्हा वाचनालय, जेलरोड धुळे आपल्या सेवेसाठी दिवाणी अंकाची मेजवानी दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ पासून आणत आहे.

दिवाळी अगोदर वर्गणी भरणाऱ्यांना २०० रु. दिवाळीत म्हणजेच दिनांक ७ नोव्हेंबर नंतर वर्गणीदार होणाऱ्यांना २५० रुपये लागतील.

ही वर्गणी सलग चार महिन्यासाठी असल्याने वाचकांना मोठा लाभ होणार आहे.

टिप : वाढत्या महागाईमुळे दिवाळी अंकाच्या किंमती गगनास भिडल्या असल्याने सर्वांनी वाचनालयाने सुरु केलेल्या योजनेचा लाभ घ्यावा.

धों. शा. गरुड जिल्हा वाचनालय, जेलरोड, धुळे

तमाम धुळे जिल्हावासियांना दिपावली व नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

इंदूबाई भदाणे प्रतिष्ठान, बोरकुंड संचलित

* प्रेरणास्थान *



श्री छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय

मोराणे, प्र.नेर, ता.जि. धुळे

मुक्तांगण इंग्लिश मेडियम स्कुल

मोराणे, प्र.नेर, ता.जि. धुळे

मुल्ये · जीवन कौशल्ये · शैक्षणिक ज्ञान · विद्यार्थी प्रतिबध्दता · प्रौढ समर्थन · उज्वल भविष्य · अध्यात्म · सामाजिक व भावनिक शिक्षण · आरोग्य · सुरक्षित पर्यावरण · शैक्षणिक दृष्ट्या आव्हानात्म शिक्षण · समुदाय

' ग्रामीण भागातील मुला-मुलींना अद्यावत सोयी सुविधा युक्त शैक्षणिक गुणवत्ते सोबत मुल्य शिक्षणासह व्यक्तिमत्व विकासाची हमी '








बाळासाहेब भदाणे
अध्यक्ष,
इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान

शालिनी भदाणे
सचिव,
इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान





आर.सी.पटेल इंग्रजी प्राथ.शाळेत दिवाळीचा उत्सव उत्साहात साजरा

शिरपूर, दि.९- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित शहरातील आदर्श नगर येथील आर. सी. पटेल इंग्रजी प्राथमिक शाळेत दिवाळी सण मोठ्या उत्साहात, आनंददायी आणि मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, तसेच दिवाळी सणाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

लक्ष्मीमातेचे पूजन करून दीपोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी रामायणातील प्रभू श्रीराम यांच्या अयोध्येतील पुनरागमनाचा प्रसंग सांगत दिवाळी सणाचे महत्त्व विशद केले. अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगुलपणाचा आणि असत्यावर सत्याचा विजय म्हणजे दिवाळी, असा सुंदर संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

कार्यक्रमात इयत्ता पहिलीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिवाळी सणावर आधारित आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या पाचही दिवसांचे महत्त्व आपल्या मनोगतातून प्रभावीपणे मांडले. दर्शिका चौधरी हिने वसुबारसचे महत्त्व सांगितले, तर कैवल्य पाटील याने धनत्रयोदशीची माहिती दिली. दर्श पाटील याने नरक चतुर्दशीचे महत्त्व स्पष्ट केले. दृष्टी गुजराथी हिने लक्ष्मीपूजनाचे महत्त्व सांगितले, तर मनस्वी पटेल हिने दिवाळी पाडव्याविषयी माहिती दिली. मनस्वी सनेर हिने भाऊबीजेचे महत्त्व सांगून भाऊ-बहिणीच्या प्रेमळ नात्याची सुंदर ओळख करून दिली. मुख्याध्यापक हेमंतकुमार देवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि फराळाचा सण नसून प्रेम, आनंद, बंधुभाव, सद्भावना आणि संस्कारांची शिकवण देणारा उत्सव आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता शिरसाठ व नेहा पाटील यांनी केले.

पान १ वरुन

कोल्हापूर गोकुळच्या अध्यक्षाची निवड आजच

अध्यक्षपदाची निवडणूक पूर्वीच्या पद्धतीनुसारच व्हायला हवी. सरकारने अध्यादेशाच्या माध्यमातून बहुमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला असून, हा सहकार क्षेत्रातील लोकशाहीवर घाला असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत कोरम पूर्ण होत नसल्याचे कारण पुढे करून तातडीने अध्यादेश काढण्याची आवश्यकता नव्हती. एका विशिष्ट संस्थेच्या परिस्थितीचा आधार घेऊन अध्यादेश काढणे योग्य नसल्याचेही सिंघवी यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी विविध न्यायालयीन निकालांचे दाखले देत सरकारच्या निर्णयाला विरोध केला.

रोहतगी यांचा सरकारसाठी बचाव

राज्य सरकार तर्फे ज्येष्ठ विधिज्ञ मुकुल रोहतगी यांनी युक्तिवाद केला. शासन नियुक्त संचालकांची नियुक्ती करण्याचा निर्णय कायदेशीर आहे. त्यामागे राज्याचे आणि जनतेचे हित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकार सहकारी संस्थांना कोट्यवधी रुपयांचे अनुदान आणि आर्थिक मदत देते. या निधीचा योग्य वापर होतो की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी शासन नियुक्त संचालक असणे आवश्यक आहे. राज्यसभेतील नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा अधिकार असू शकतो तर सहकारी संस्थांमधील शासन नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार का नसावा, असा सवालही रोहतगी यांनी उपस्थित केला. हा अध्यादेश केवळ गोकुळसाठी काढण्यात आलेला नसून, शासन नियुक्त संचालकांच्या नियुक्तीबाबतचा व्यापक निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे याचिका फेटाळण्यात यावी, अशी मागणी सरकारच्यावतीने करण्यात आली.

२५ विरुद्ध १२ असे सत्तासमीकरण

गोकुळच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकल्या आहेत, तर महायुतीला १२ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे समविचारी आघाडीचे संख्याबळ अधिक असले, तरी अध्यक्षपदाच्या निवडीसाठी आवश्यक असलेला कोरम पूर्ण करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गोकुळमध्ये पाच शासन नियुक्त संचालक नेमण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी चार संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली. या निर्णयामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील सत्तासमीकरण बदलण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, न्यायालयाच्या ताज्या आदेशामुळे या ४ संचालकांची मते अंतिम निकालात मोजली जाणार नाहीत.

आज निवडणूक, निकाल २५ नोव्हेंबरला

न्यायालयाच्या आदेशानुसार उद्या (दि.१०) गोकुळच्या अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रीकरण केले जाणार आहे. शासन नियुक्त संचालकांची मते बाजूला ठेवून निकाल जाहीर केला जाणार असला, तरी अंतिम निर्णय न्यायालयाच्या निकालावर अवलंबून असेल. दरम्यान, २५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीत राज्य सरकारच्या अध्यादेशाच्या वैधतेबाबत न्यायालय काय भूमिका घेते, याकडे कोल्हापूर जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे. त्यामुळे उद्याची निवडणूक आणि त्यानंतरचा न्यायालयीन निर्णय गोकुळच्या सत्तासंघर्षासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

अजित पवारांचा घातपात तटकरेंची चौकशी करा

रामदास कदम यांनी सुनील तटकरे यांच्यावर थेट निशाणा साधताना धक्कादायक वक्तव्य केले. ते म्हणाले, सुनील तटकरे हे अंतुले यांचे पीए होते. अंतुले यांना तटकरे यांनीच संपवलं. जो-जो माणूस तटकरे यांना जवळ करतो, त्यालाच संपवण्याचे काम ते करतात. त्यांना स्वतःला उपमुख्यमंत्री व्हायचे होते. अजितदादांच्या घातपातामागे त्यांचा हात होता का? या दिशेने तपास केला पाहिजे. कदम यांच्या या वक्तव्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, अजित पवार यांच्या मृत्यूच्या प्रकरणात तटकरे यांचे नाव जोडत त्यांच्या चौकशीची मागणी केल्याने या वादाला गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. मात्र, कदम यांनी केलेले हे आरोप असून, त्यांना अद्याप कोणताही अधिकृत पुरावा किंवा तपासाचा निष्कर्ष असल्याचे समोर आलेले नाही.

तटकरे यांनी आरोप फेटाळले

रामदास कदम यांनी केलेले आरोप सुनील तटकरे यांनी फेटाळून लावले आहेत. आपल्यावरील आरोप पूर्णपणे खोटे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच याबाबत लवकरच पत्रकार परिषद घेऊन सविस्तर उत्तर देणार असल्याचेही तटकरे यांनी सांगितले आहे. त्यामुळे तटकरे यांच्या पुढील भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. रामदास कदम यांच्या आरोपांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. रामदास कदम यांनी यापूर्वीही तटकरे यांच्यावर अनेकदा आरोप केले आहेत. सुनील तटकरे चाळीस वर्षांपासून कोकणच्या राजकारणात सक्रिय आहेत. शिवसेनेच्या प्रभावक्षेत्रात राष्ट्रवादी काँग्रेसचा पक्ष विस्तारण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे हा वाद स्थानिक राजकीय संघर्षातून निर्माण झाला असल्याचे उमेश पाटील यांनी म्हटले.

रायगडमधील स्थानिक राजकीय वर्चस्वाचा संघर्ष आता थेट राज्यस्तरीय राजकारणात पोहोचला आहे. एकीकडे रामदास कदम यांच्याकडून सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप होत आहेत, तर दुसरीकडे राष्ट्रवादीकडून या आरोपांना प्रत्युत्तर दिले जात आहे. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. अजित पवार यांच्या मृत्यूच्या प्रकरणाचा उल्लेख करत रामदास कदम यांनी केलेल्या आरोपांमुळे या वादाला नवे राजकीय वळण मिळाले आहे.

पान १ वरुन

दिवाळीत फटाक्यांना शासनाकडून ब्रेक

फटाक्यांमधून निघणारे जळते अवशेष इमारतींच्या खिडक्या, गच्च्या, बाल्कनी तसेच ज्वलनशील वस्तूंवर पडून आग लागण्याचा धोका निर्माण होत आहे. काही नागरिक हातात रॉकेट धरून फटाके उडवत असल्याचेही प्रकार समोर आले आहेत. या पार्श्वभूमीवर संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या महसुली हद्दीत रॉकेट आणि हवेत उडणाऱ्या तत्सम फटाक्यांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. सार्वजनिक तसेच खासगी जागा, निवासी इमारती, गच्च्या, बाल्कनी आणि आवारांमध्येही हे निर्बंध लागू असतील.

आठ जानेवारीपर्यंत फटाक्यांवर बंदी

जिल्हाधिकाऱ्यांचा हा आदेश आजपासून ८ जानेवारी २०२७ च्या मध्यरात्री पर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अग्निशमन विभागाला देण्यात आली आहे. गृहनिर्माण संस्थांनीही आपल्या सभासदांना या आदेशाची माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१ आणि ६० नुसार कारवाई केली जाणार आहे. इतर प्रकारचे फटाके वापरण्यास मात्र प्रचलित कायदे, न्यायालयीन निर्देश आणि सक्षम प्राधिकरणांच्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहणार आहे.

मुंबईतही रॉकेट फटाक्यांवर निर्बंध?

ठाणे जिल्ह्यापाठोपाठ मुंबईतही रॉकेट फटाक्यांच्या वापरावर बंदी घालण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून यासंदर्भात अधिकृत परिपत्रक जारी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबई आणि ठाणे परिसरातील नागरिकांचे या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

स्वरांगण दिवाळी पहाट कार्यक्रमाला

गीतांतून भक्तिरस आणि भावनांचा सुंदर आविष्कार घडविला. पूजा जैन यांनी मशंभो शंकराफ, मरुणुझुणु रुणुझुणु हे भ्रमराफ, नंदकिशोरा या गीतांचे सादरीकरण करून रसिकांची वाहवा मिळवली. तर डॉ. प्रशांत पवार यांनी सौभाग्यदा लक्ष्मी आणि कानडा राजा पंढरीचा या गीतांतून भक्तिसंगीताची अनुभूती दिली. कार्यक्रमाची सांगता डॉ. प्रशांत पवार यांच्या सुरेल भैरवीने झाली. भैरवीच्या स्वरांनी रसिकांना एका अविस्मरणीय सांगीतिक अनुभवाची भेट दिली. या संपूर्ण मैफलीला कुशल वादकांची उत्तम साथ लाभली. हार्मोनियमवर प्रसन्न दाऊतखाने, तबल्यावर सुधांशू रामोळे, तबला व टाळ यांवर मोहित वारुडे, पखवाजवर राकेश बोरसे, कीबोर्डवर विनीत भावसार, बासरीवर रोहन चौधरी आणि टाळांवर एकनाथ भोई यांनी आपल्या वादनकौशल्याने गीतांना अधिक समृद्ध केले. वाद्यांच्या सुरेल साथीने संपूर्ण वातावरण संगीतमय झाले आणि वादकांनीही आपल्या अप्रतिम वादनातून रसिकांची विशेष दाद मिळवली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक नागसेन पेंढारकर यांनी केले. बहारदार सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन किरण दाभाडे यांनी केले. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे नियोजन गाडगेबाबा शैक्षणिक व सांस्कृतिक सेवा मंडळ, शिंदे या संस्थेने केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गिरीश वसावे, तुषार सोनवणे, मनोज सोनार, कुणाल वीर, हेमंत पेंढारकर, तनिष्का पेंढारकर आणि प्रफुल महिरे यांनी विशेष परिश्रम घेतले. दिवाळीच्या प्रसन्न पहाटे भक्तिरस, भावभावना, नृत्य आणि सुरेल संगीताचा संगम अनुभवताना नंदुरबारकर रसिकांची सकाळ खऱ्या अर्थाने स्वरमयी झाली. स्वरांगण दिवाळी पहाट हा कार्यक्रम रसिकांच्या स्मरणात राहणारा एक अविस्मरणीय सांस्कृतिक सोहळा ठरला.

शालिनी नटावदकर पतसंस्थेने

फेडरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी इंजि.विजय हिलाल मंगळे यांच्याकडे सभासदत्वाचा अर्ज व धनादेश सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी प.खा.भि.सेवा मंडळ, नंदुरबार या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुहास ज. नटावदकर, सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक नीरज चौधरी, पतसंस्थेचे सचिव गणेश राजपूत तसेच पतसंस्थेच्या चेअरमन सौ.सुहासिनी सुहास नटावदकर उपस्थित होते. या सभासदत्वामुळे पतसंस्थेला राज्यस्तरीय सहकारी फेडरेशनशी जोडले जाण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

स्वास दिवाळी निमित्त
वीर सावरकर अपार्टमेंट
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया :- 1 BHK - 1000 स्के.फुट
2 BHK - 1200 स्के.फुट,
3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

अकौंटंट पाहिजे
लेडीज/जेन्टस
-: संपर्क :-
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, प्रकाश टॉकीजसमोर, धुळे
9423135555

पाहिजे
शहादा येथे हॉस्पिटल अटॅच मेडिकलसाठी फार्मासिस्ट/नोंदणीकृत फार्मासिस्ट पाहिजे. अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य
-: संपर्क :-
9403432739
9356666784

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..


१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.
धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...
शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
फो. 9422285091

पान १ वरुन

शिंदखेडा ता.तील आच्छी व दत्ताणे गावातील

दिनेश पोद्दार, तहसीलदार नितीनकुमार देवरे, तालुका पुरवठा अधिकारी नितीन नंदावार, पुरवठा निरीक्षक धनराज पाटील यांच्यासह शेतकरी, युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दिवाळीच्या निमित्ताने शेतकरी कुटुंबांच्या दिवाळी फराळाच्या आनंदात सहभागी होत त्यांनी शासनाच्या विविध मदत व विकास योजनांची माहिती दिली. दुष्काळी परिस्थितीच्या पहिल्याच यादीत धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यांचा समावेश करण्यात आला. दिवाळीपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत प्रत्येकी ५ हजार रुपयांची अग्रीम मदत जमा करण्यास सुरुवात करण्यात आली. शेतकऱ्यांना मदत मिळण्याबरोबरच ती योग्य वेळी मिळणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे सणाच्या काळात शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे. पुढील टप्प्यातील मदतही पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन प्रयतक्शील असल्याचे पालकमंत्री श्री.रावल यांनी सांगितले.

अन्नधान्य व साड्यांचे वाटप

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कुटुंबांना दिवाळीचा सण आनंदात साजरा करता यावा, या उद्देशाने आच्छी व दत्ताणे येथे अन्नधान्य आणि भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. शिंदखेडा तालुक्यातील १४ हजार ३१४ अंत्योदय महिला लाभार्थ्यांना साड्यांच्या वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी काही महिलांना प्रातिनिधिक स्वरूपात साड्यांचे वितरण करण्यात आले. तसेच पुरवठा विभागाच्या निर्देशानुसार तालुक्यातील प्रत्येक गावात दिवाळीपूर्वी अन्नधान्याचे वाटप पूर्ण करण्यात आले असून, सुमारे १ लाख ९५ हजार लाभार्थ्यांपर्यंत ज्वारी, गहू, साखर, तांदूळ आदी अन्नधान्य दिवाळीपूर्वी पोहोचवण्यात आल्याचे सांगत पुणे मर्चंट चेंबरच्या सहकार्यानेही दिवाळी भेटवस्तू उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल पालकमंत्री श्री. रावल यांनी संस्थेचे आभार मानले. संकटाच्या काळात गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे ही सामाजिक बांधिलकी असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील आपुलकी आणि सहकार्याची भावना अधिक दृढ होते, असे त्यांनी नमूद केले.

पात्र शेतकऱ्यांना मदतीची हमी

दुष्काळी मदतवाटपासाठी महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या यंत्रणांनी केलेल्या कामाचे पालकमंत्री श्री. रावल यांनी कौतुक केले. कृषी सहाय्यक, तलाठी आणि ग्रामसेवक यांनी रात्रंदिवस विशेष प्रयत्न करून शेतपिकांच्या नुकसानीचे १०० टक्के पंचनामे पूर्ण केले.तसेच मदत व पुनर्वसन विभागाच्या संकेतस्थळावर बँक खाते क्रमांक, आयएफएससी क्रमांक, शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) आणि ग्रीस्टॅक नोंदणीसंबंधी आवश्यक कार्यवाहीचेही १०० टक्के काम पूर्ण करण्यात आले. जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या समन्वयामुळे मदतवाटपाच्या प्रक्रियेला गती मिळाल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ अद्याप न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित यंत्रणा आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

शेतकऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते

आच्छी व दत्ताणे येथील कार्यक्रमात पालकमंत्री श्री. रावल यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातील आठवणींना उजाळा दिला. पूर्वी तापी नदी ओलांडून गावोगावी केलेला प्रवास, नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी झाल्याचे प्रसंग आणि गेल्या २ दशकांत तालुक्यात झालेल्या विकासकामांचा त्यांनी उल्लेख केला. तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिक हे आपल्या मोठ्या परिवाराचे सदस्य आहेत. त्यामुळे दिवाळीचा आनंद त्यांच्यासोबत द्विगुणित करण्यासाठी येथे आलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मदतवाटपात शिंदखेडा प्रथम

प्रास्ताविक करताना तहसीलदार नितीनकुमार देवरे म्हणाले की, धुळे जिल्ह्यातील एकूण ३ लाख ६५ हजार ११ शेतकऱ्यांपैकी सुमारे २ लाख ५९ हजार शेतकऱ्यांच्या मदतीला मंजुरी मिळाली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या मदतीला पुढील आठ दिवसांत मंजुरी मिळेल, असे यावेळी सांगण्यात आले. शिंदखेडा तालुक्यातील ८३ हजार २१६ खातेदारांपैकी ६९ हजार १४२ शेतकऱ्यांच्या मदतीला मंजुरी मिळाली असून, हे प्रमाण सुमारे ८३ टक्के आहे. या कामगिरीत शिंदखेडा तालुका जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर आहे. तालुक्यातील ५० हजार ७९२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत प्रत्येकी ५ हजार रुपयांची अग्रीम मदत जमा झाली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांतही पुढील आठ दिवसांत मदतीची रक्कम जमा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने सुरू असल्याचेही तहसीलदार श्री. देवरे यांनी यावेळी सांगितले.

झोक्याचा फास तरुणाचा मृत्यू

परिसरातील काहींनी आनंद खंडाळे यांच्या गळ्याचा दोर वेगळा करुन त्यांना उपचारासाठी श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हवालदार कुणाल साळवे तपास करीत आहेत.

महिंदळयात घरफोडी गुन्हा दाखल

सोन्याचे छोटे कानातले, सोन्याचे मोठी माळ, सोन्याचे अंगठी, सोन्याचे धम्म चक्र, चैन, मनी मंगळसुत्र, सोन्याची नथ या दागिन्यांसह २० हजारांची रोकडचा समावेश आहे. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात सोमवारी घरफोडीचा गुन्हा दाखल झाला. पोलीस उपनिरीक्षक खालीदा सय्यद तपास करीत आहेत.

बीएसएनएल कार्यालय मागील खोलीला आग

धुळे, दि.९- शहरातील मुख्य टपाल कार्यालयाजवळ बीएसएनएल कार्यालयामागील एका खोलीत आग लागल्याची घटना आज पहाटे चारच्या सुमारास घडली. आगीत त्या खोलीतील फर्निचरसह कागदपत्रे जळून नुकसान झाले. अग्निशामक दलाच्या बंबाद्वारे आग आटोक्यात आली.

मुख्य टपाल कार्यालयाजवळच बीएसएनएलचे कार्यालय आहे. या कार्यालयाजवळच बंद खोलीत आग लागल्याची घटना आज पहाटे काहींच्या निदर्शनास आली. याबाबत अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. एक बंब घटनास्थळी तत्काळ हजर झाला. बंबाद्वारे तात्काळ आग आटोक्यात आली. आगीत त्या बंद खोलीतील फर्निचरसह कागदपत्र खाक झाले. कागदपत्र कसली होती ते समजू शकलेले नाहीत.

फ्लॅट भाड्याने देणे
गव्हर्मेंट किंवा कंपनी ऑफिसर फॅमिली करिता २ बीएचके फ्लॅट सर्व सोयीयुक्त दत्त मंदिर सत्संग कॉलनी येथे भाड्याने देणे आहे
संपर्क- प्रशांत वाणी
7620009038
9422239358

पान १ वरुन

गायरान व वैयक्तिक जमिनीवर अति.

किंवा अन्य मान्यताप्राप्त संस्थांकडून उपलब्ध करून घेता येईल. कमी पाण्यात येणाऱ्या, कमी कालावधीत उत्पादन देणाऱ्या आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणाऱ्या चारा पिकांच्या वाणांना प्राधान्य दिले जाणार आहे. स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार, सिंचनाची शाश्वत उपलब्धता आणि पीक कालावधी विचारात घेऊन पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी योग्य वाणांची शिफारस करणार आहेत. तर, ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभाग या कामांच्या कार्यान्वयीन यंत्रणा असतील.


ग्रामपंचायतीच्या कामांना तालुका पशुधन विकास अधिकारी तांत्रिक, तर गटविकास अधिकारी प्रशासकीय मान्यता देतील. कृषी विभागाच्या कामांसाठी कृषी पर्यवेक्षक तांत्रिक आणि तालुका कृषी अधिकारी प्रशासकीय मान्यता देतील. पशुसंवर्धन विभागाच्या कामांसाठी पशुवैद्यकीय अधिकारी तांत्रिक, तर सहायक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी प्रशासकीय मान्यता देतील. तांत्रिक सहायक या कामांची मोजमापपुस्तिकेत नोंद करणार असून संबंधित अधिकाऱ्यांनी या नोंदी प्रमाणित केल्यानंतर कार्यान्वयीन यंत्रणा विहित पद्धतीने देयके तयार करून ऑनलाइन अदा करतील. शासनाने सहायक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालयांना चारा लागवडीसह पशुसंवर्धन विभागाशी संबंधित अन्य अनुज्ञेय कामांसाठी कार्यक्रम अधिकारी म्हणून घोषित करून प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान केले आहेत. या कामांमध्ये मजुरांच्या श्रमांना प्राधान्य देणे बंधनकारक राहणार असून मजुरांमार्फत करता येणाऱ्या कामांसाठी यंत्रसामग्रीचा वापर करता येणार नाही. तसेच योजनेतून एकदा चारा लागवड केलेल्या क्षेत्रावर पुन्हा त्याच क्षेत्रासाठी चारा लागवडीचे काम मंजूर होणार नाही. लाभार्थ्यांची निवड, कामांचे नियोजन, सामाजिक अंकेक्षण आणि आर्थिक मर्यादांसह योजनेच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

समाजातील काही घटकांना फराळ वाटप

आदी उपस्थित होते. दिवाळी किटमध्ये वेगवेगळ्या २० प्रकारचा किराणा माल देण्यात आला. यावेळी पात्र लाभार्थी दिव्यांग बंधु भगिनींना ग्रामपंचायतीतर्फे धनादेश देण्यात आला. जोशाबा सांस्कृतिक क्रीडा मंडळाचे अध्यक्ष दिलीप माळी यांनी प्रास्ताविक केले. हाजी आरिफ खॉ पठाण यांनी सुत्रसंचलन केले. जोशाबा मंडळाचे अध्यक्ष दिलीप माळी (रुग्ण मित्र), अशोक भिका माळी, देविदास बडगुजर, नंदलाल बडगुजर, अशोक माळी सरपंच, रमेश माळी, विठ्ठल चित्ते, संतोष धोबी, छाया कासार, ज्योती देवरे, स्मिता तांबट, वंदना माळी, सुलभा ईशी, मंगला इंदासराव, वैशाली शिरसाट, ज्योती अहिराव, अनिता वाणी या पदाधिकारींनी संयोजन केले.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

२० स्मृतिदिन



कै. दादासो.के.जी. मिस्त्री

स्वर्गवास १०/११/२००६ (महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक व दलित मित्र)

आपल्या अफाट कार्य कुशलतेने आम्हास शिखरावर नेण्याचे सामर्थ्य व जिद्द दिली समाजकारण व राजकारणाबरोबर आदर्श कुटुंबाची घडी बसवून जीवनात जगण्याचा आम्हास मार्ग दिला म्हणूनच दादा आज प्रगतीचा रथ चिकाटी विना चालवितांना आम्हाला आपली क्षणोक्षणी आठवण मात्र येते.

* शोकाकुल *

राजेंद्र केदारेश्वर मिस्त्री (मुलगा) सौ.नुतन राजेंद्र मिस्त्री (सुन)
प्रवीण केदारेश्वर मिस्त्री (मुलगा) सौ.वर्षा प्रवीण मिस्त्री (सुन)
पंकज केदारेश्वर मिस्त्री (मुलगा) सौ.विजया पंकज मिस्त्री (सुन)
संजयराव माधवराव महिंदळेकर (जावई) सौ.जयश्री संजयराव महिंदळेकर (मुलगी)
दिपकराव शांताराम निकुंभ (जावई) सौ.सुजाता दिपकराव निकुंभ (मुलगी)
डॉ.सुनीलजी सरोदे (नातजावई) डॉ.शामली सुनीलजी सरोदे (नात)
डॉ.अजिंक्य राजेंद्र मिस्त्री (नातु) डॉ.नम्रता अजिंक्य मिस्त्री (नातसुन)
नाती- श्रृती, श्रद्धा, अपूर्वा, साक्षी, नातू- निरज, अथर्व, अमेय, शर्विल, रियान, बाळा

समस्त मिस्त्री परिवार, धुळे.

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागू
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०